



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






वर्ष २९ वे | अंक ८० | पाने ६ | शनिवार | दि. १९ जुलै २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# आता दुकाने नाही शाळाच बंद करेन

## त्रिभाषा सूत्रावरुन राज ठाकरेंचा सरकारला इशारा:दुबेला समंदर मे डुबो-डुबो कर मारेंगे

***मुंबई/प्रतिनिधीः-***

बिहारचा खासदार दुबे हा आम्हाला म्हणतो की, तुम्ही आमच्याकडे येऊन दाखवा, तुम्हाला पटक पटक के मारेंगे. या खासदारावर केस झाली का? याचा विचार तुम्ही आम्ही करायला हवा. कारण या नेत्यांना बोलतांना माहिती असते की, सरकार आपल्या पाठिशी आहे. त्यामुळे ही अशा प्रकारची भाषा करत असतात. पण दुबे मी तुम्हाला सांगतोय की, तुम्ही मुंबईत येऊन दाखवा. तुम्हाला मुंबईच्या समुद्रात डुबो डुबो के मारेंगे. असा इशाराच राज ठाकरे यांनी देत पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी आणून दाखवाच असा सवाल मुख्यमंत्री फडणवीसांना देत, दुकाने नाही तर शाळा सुद्धा बंद पाडेन.



त्रिभाषा धोरणानंतर महाराष्ट्रातील वातावरण पेटलं असून सरकारला शेवटी हे धोरण मागे घ्यावं लागलं. त्यानंतर मुंबईत मराठी-हिंदी वाद पाहायला मिळाला. तसेच, भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांना आव्हान केले होते. तुम्ही उत्तर भारतात येऊन दाखवा, तुम्हाला पटक-पटक के मारेंगे असे दुबे म्हणाले होते. यावर आज मीरा रोडमध्ये बोलतांना राज ठाकरे यांना खासदार निशिकांत दुबे यांचा चांगलाच समाचार घेतला आहे.

काँग्रेसच्या काळापासून हे सुरू आहे. इतका प्रचंड मोठा लढा संयुक्त महाराष्ट्राचा झाला. मुंबईला महाराष्ट्रापासून बाजूला करायचा डाव होता, हा डाव गुजराती व्यापऱ्यांचा आणि गुजराती नेत्यांचा होता. मुंबई महाराष्ट्राला मिळू नये हे कोणी म्हटले होते वल्लभभाई पटेल यांनी सांगितले होते. त्यांना लोह पुरुष मानतो, आपण त्यांना आदर्श मनात होतो, त्यांनी महाराष्ट्राला विरोध केला. मोरारजी देसाई गोळीबार करून मराठी माणसाला ठार मारले होते. यांचा अनेक वर्षांपासून मुंबईवर डोळा आहे.बिहारमधील लोकाना माझं एक विचारणं आहे- २८ सप्टेंबर २०११ हिंमतनगरजवळ १४ महिन्याचा मुलीवर बलात्कार झाला. त्यानंतर बिहारी लोकांना मारहाण केली. जवळपास २० हजार लोकांना गुजरातमधून हाकलून लावले. तेव्हा तुम्हाला या घटनेच्या बातम्या दिसल्या का?, असा थेट सवाल राज ठाकरे यांनी केला.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. शिवतीर्थावर मी मोदींना सांगितले होते मराठी भाषेला तुम्ही अभिजात भाषेचा दर्जा द्या. दर्जा मिळाला पण एक रुपया निधी मिळाला नाही. एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा असेल तर कमीत कमी १४०० वर्षांचा इतिहास हवा, हिंदीला अभिजात भाषेचा दर्जा मिळायला अजून १२०० वर्ष आहे. आणि ही भाषा तुम्ही आमच्यावर लादणार?कमीत कमी १४०० वर्ष जुनी भाषा असायला हवी. हिंदीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. या भाषेचा इतिहास १२०० वर्षांचा आहे आणि ती भाषा तुम्ही आमच्यावर लादणार का? हिंदीमुळे केवळ बॉलिवूडच्या नट आणि नट्यांचं भलं झालं. असा सवाल राज ठाकरे यांनी केला.

# इस्लामपूर आता होणार ईश्वरपूर..!

## महायुतीचा जल्लोष विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात घोषणा

***इस्लामपूर/प्रतिनिधीः-***

'इस्लामपूर' शहराचे नाव बदलण्याबाबत आज शुक्रवारी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात घोषणा झाली. इस्लामपूर शहराचे नाव आता ईश्वरपूर करणार असल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी जाहीर केल्यानंतर इस्लामपुरात हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांसह महायुतीच्या शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस,भाजपा रयत क्रांती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. पान २ वर



### दिर्घकाळ केलेल्या संघर्षाचे फलित

इस्लामपूरचे नाव 'ईश्वरपूर' करण्यासाठी राज्यातील भाजपा महायुती सरकारने केंद्र सरकारकडे त्वरित पाठवलेल्या शिफारशीचं मनःपूर्वक स्वागत करतो. हा निर्णय म्हणजे स्थानिक जनतेच्या भावना, लोकप्रतिनिधींचा सातत्यपूर्ण आग्रह आणि दीर्घकाळच्या संघर्षाचं फलित आहे. इस्लामपूरचंच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक ओळखीचं जतन करण्यासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल. धन्यवाद भाजपा महायुती सरकार!

**सम्राट महाडीक**
**जिल्हाध्यक्ष भाजप**

मी नगराध्यक्ष असताना ईश्वरपूरच्या मागणीसाठी आंदोलन केले होते.आमदार सदाभाऊ खोत यांनी विधिमंडळात देखील ईश्वरपूरच्या नामकरणाची मागणी केली होती. ईश्वरपूर नगरीच्या सर्व नागरिकांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार एकनाथ शिंदे,आमदार सदाभाऊ खोत यांचे या निर्णया बद्दल स्वागत करून महायुती सरकार चे आभार व्यक्त करतो.

**निशिकांत भोसले-पाटील**
**जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी**

इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर करण्याचा निर्णय हा जनभावनांचा विजय असून, आपल्या संस्कृतीचे जतन करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा तो पुरावा आहे. ही दीर्घकाळ प्रलंबित मागणी अखेर पूर्ण होत आहे. सरकारच्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत. आमचे सर्व भारतीय जनता पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी वारंवार या नाव बदलासाठी प्रयत्नशील होते.

**राहुल महाडीक**
**संचालक सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.**

### सर्व ईश्वरपूर वासियांच्या मागणीला यश..

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९८६ साली नामकरण केल होत त्यामुळे शिवसेनेची आग्रही मागणी होती.ती मागणीला शहरातील ३५ हजार नागरीकांनी स्वाक्षरीसह पाठींबा दिला होता.महायुती सरकारने याची दखल घेतली मी शहरातील नागरिकांचे मनापासून अभिनंदन करतो.तसेच या नामकरण करण्यात सहकार्य असणाऱ्या सर्वच महायुतीच्या नेत्यांना धन्यवाद देतो...

**आनंदराव पवार**
**जिल्हाप्रमुख, शिवसेना**

# हॉटेलमधील वादातून युवकाच्या डोक्यात घातले जेवणाचे ताट

## कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

***कराड/प्रतिनिधीः-***

शहरातील गोवारे रस्त्यावर गजानन हौसिंग सोसायटीत असलेल्या एका हॉटेलमध्ये जेवणाच्या ठिकाणी गप्पा मारत असताना झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. यावेळी दोन जणांनी एका युवकाच्या डोक्यात जेवणाचे ताट घातले. याबाबतची नोंद कराड शहर पोलीस ठाण्यात झाली आहे.

याबाबत अभिजीत तानाजी ओव्हाळ (वय ३२) मूळ रा. कोपर्डे हवेली, (सध्या रा. गुत्तांड, महाबळेश्वर) याने फिर्याद दिली आहे. त्यावरुन गणेश बालेखान सरगडे व अल्पेश आनंदा गाडे, दोघेही रा. कोपर्डे हवेली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, कोपर्डे हवेली येथील अभिजीत ओव्हाळ हा युवक बुधवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास आपल्या काही मित्रांसह गजानन हौसींग सोसायटीतील एका हॉटेलमध्ये जेवणासाठी गेला होता. त्याच्यासोबत गणेश सरगडे, अल्पेश गाडे, अक्षय सावंत व संदेश सरगडे हे मित्र होते. जेवण सुरू असताना किरकोळ कारणावरून त्यांच्यात वाद झाला. वादाचे रुपांतर मारामारीत झाली. यावेळी गणेश सरगडे याने जेवणाचा टेबल उलथवून, स्टीलच्या ताटाने अभिजीत ओव्हाळ यांच्या डाव्या डोक्यावर, भोवईजवळ व ओठांवर मारहाण केली. त्यानंतर अल्पेश गाडे यानेदेखील हाताने आणि लाथाबुक्क्यांनी अभिजीतला बेदम मारहाण केली. त्यावेळी दोघेही मद्यधुंद अवस्थेत होते, असे फिर्यादीत नमूद आहे. याबाबतची नोंद कराड शहर पोलीस ठाण्यात झाली असून पोलीस तपास करत आहेत.

# वसगडे रेल्वेमार्गावर शेतकरी झोपले

***मिरज/प्रतिनिधीः-***

वसगडे (ता. पलूस) येथे भरपाईच्या मागणीसाठी रेल्वे विरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन गुरुवारी दुसऱ्या दिवशीही सुरूच होते. दिवसभर शेतकरी व रेल्वे अधिकाऱ्यांत चर्चा अयशस्वी झाल्याने मिरज पुणे रेल्वे मार्गांवरील वाहतूक विस्कळीत झाली. यामुळे लांब पल्ल्याच्या काही एक्स्प्रेस दौड मार्गे वळविण्यात आल्या. तसेच अनेक रेल्वेगाड्या विलंबाने धावत असल्याने प्रवाशांचे हाल झाले.










### मंडळ..

लोकशाही धर्म स्थळ
खरोखर विधी मंडळ
चित्र विचीत्र बदलले
कायम चाले गोंधळ
अ संतोष उसळलेला
बाहेर उत्सर्जे मळमळ
विवेकविसरून सगळे
कुणी ओकतात गरळ
बॉंब पेक्षा स्फोटक ते
शब्द विखारी ते बरळ
वाकडे दिसते जगाला
चालले असता सरळ
सत्र चालू रे असताना
जागो जागी अडथळ
हलक्याविनोदाने जाई
कधी कधी ती मरगळ
विरोधक विचारी प्रश्न
सत्ताधीशांना भोवळ
भुलावण रे समस्यांची
करतात कुणी निव्वळ
प्रसिद्धी मिळवायला
पांढरे करतात उखळ
संविधानाची पवित्रता
अगदीचं थोडे निखळ
संविधानाचा ठेवे मान
विश्वास वाढवा अढळ
जबाबदारी सर्वांचीचं
समस्या सुटती सढळ

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# संपादकीय

## जनसुरक्षा विधेयकाबद्दल संभ्रम

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक गुरुवारी १० जुलै रोजी राज्याच्या विधानसभेत बहुमताने मंजूर झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे विधेयक मांडले. कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या किंवा त्यासारख्या संघटनांच्या बेकायदेशीर कृत्यांचा प्रतिंबध, करण्यासाठी हे विधेयक असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. त्यावरूनच आता मत, मतांतरे सुरू झाली आहेत. हे विधेयक आल्यानंतर डाव्या संघटना आणि डाव्या संघटनांशी संबंधित लोकांना अटक केली जाईल, त्यांच्यावर दडपशाही आणि बळाचा वापर केला जाईल, अशी भीती विविध संघटना आणि विरोधकांनी व्यक्त केली होती. परंतु असे काही होणार नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे. तरीही विधेयकातील अनेक मुद्यांवर प्रश्न उपस्थित होत आहेत. कडवी डावी विचारसरणी याबाबत सरकारची नेमकी व्याख्या काय आहे? त्यांसारख्या संघटना म्हणजे कोणत्या संघटना आहेत? याची व्याख्या काय आणि कोण ठरवणार? असे प्रश्न सामाजिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केले जात आहेत. महाराष्ट्र विधानसभेत मंजूर झालेले जनसुरक्षा विधेयक यामुळेच चर्चेत आले आहे.

जुलै २०२४ मध्ये महायुती सरकारने पहिल्यांदा जनसुरक्षा विधेयक आणले. तेव्हा व्यक्ती आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी, विधेयक असल्या सांगितले होते. यावरच अनेक संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला होता. या विरोधानंतर दोन्ही सभागृहांची संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली २५ सदस्यांची ही समिती होती. या समितीने मूळ विधेयकात काही बदल करत बुधवारी (९ जुलै रोजी ) विधानसभेत अहवाल सादर केला होता. यापूर्वी तेलंगणा, आंध्रप्रदेश, ओरिसा, झारखंड या राज्यांनी अशा प्रकारचा कायदा केला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले आहे. फडणवीस यांनी म्हटले आहे की, या राज्यांनी केलेल्या कायद्यानुसार केंद्र सरकारने सगळ्या राज्यांना असा कायदा केला पाहिजे, हा सल्ला दिला. यामागचे कारण म्हणजे, यापूर्वी अशाप्रकारे बॅन करताना काही केसेसमध्ये आपण यूएपीए कायदा लावला, आणि सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की जोपर्यंत सक्रिय टेरर अक्टिव्हिटी होत नाही तोपर्यंत यूएपीए लावता येणार नाही. म्हणून असे लक्षात आले की, यूएपीएच्या माध्यमातून अशा प्रकारच्या गोष्टींवर कारवाई करता येणार नाही. म्हणून केंद्र सरकारने या राज्यांसारखा कायद्या करण्यासाठी सांगितले. अशा प्रकारचा कायदा तेलंगणा, आंध्रप्रदेश, ओरिसा, झारखंड या राज्यांनी केला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले आहे.

मुख्यमंत्री यांच्या मते सरकारला कडवी डावी विचारसरणी नष्ट करायची आहे. कारण भारतीय संविधानाने जी व्यवस्था उभी केली आहे ती आम्हाला मान्य नाही, असे म्हणून कडवी डाव्या संघटनेचा लढा सुरू असतो. त्याचवेळी याचे दुसरे स्वरूप तयार होत आहे. अशा अनेक संघटना आहेत, ज्यांची नावे पाहून त्या लोकशाही वाचवण्यासाठी तयार झालेल्या संघटना आहेत, असे वाटते. पण त्यांची कामे पाहिल्यानंतर ते लोकशाही मानत नाहीत आणि त्या संघटना भारताचे संविधान देखील मानत नाहीत हे समजते. जर कडवी डाव्या विचारांच्या संघटना आणि व्यक्ती यांच्यावर महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकातील तरतुदीनुसार कारवाई करणार असतील तर कडवी उजव्या संघटनांवर कारवाई का केली जाणार नाही, असा प्रश्न अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांचा हा मुद्दा रास्त वाटतो. दंडक आरण्य आदिवासी किसान मजदूर संघटना, क्रांतिकारी आदिवासी महिला संगठण, रिवॉल्यूशनरी डेमोक्रटीक फ्रंट, विरोधी सांस्कृतिक चळवळ, इंडियन असो. ऑफ पिपल्स लॉयर, कमिटी अगेन्स्ट वॉयलंस ऑफ वूमन, कबीर कला मंच, ही यूपीए सरकारने लोकसभेत फ्रंटल ऑरगनायझेशनची दिलेली माहिती आहे. यासंदर्भात यूपीए सरकारच्या काळात याचिका दाखल झाली आहे. या संघटनांबाबत, अर्बन माओइस्ट त्यांनीच शब्द वापरला आहे, असेही फडणवीस यांनी म्हटले आहे.

यापूर्वीही जनसुरक्षा विधेयकातील कठोर तरतुदींना सामाजिक संघटनांनी आणि राजकीय विरोधी पक्षांनी विरोध दर्शवला होता. व्यक्ती आणि संघटना अशी तरतूद असल्यास सरकारला विरोध करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा संघटनेवर कारवाईचा अधिकार सरकारला प्राप्त झाला असता, असे म्हटले जात होते. यामुळे व्यक्ती आणि संघटना ही शब्दरचना बदलण्यात आली आहे. सदर विधेयकावर १२ हजार ५०० सूचना प्राप्त झाल्या होत्या. चिकित्सा समितीच्या म्हणण्याप्रमाणे, मसुद्यात तीन मुख्य बदल करण्यात आले आहेत. १. कडव्या डाव्या विचारसरणीच्या आणि तत्सम संघटना असा बदल, २. सल्लागार मंडळात, राज्य शासनाने नियुक्त केलेले, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश सल्लागार मंडळाच्या अध्यक्षपदी, तर दोन सदस्य त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश आणि दुसरे सदस्य उच्च न्यायालयातील सरकारी वकील सदस्यपदी असतील., ३. या कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्याची चौकशी पोलीस उपनिरीक्षकांऐवजी पोलीस उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी करतील. जनसुरक्षा विधेयकातील काही कठोर तरतुदींना सामाजिक संघटनांनी आणि राजकीय विरोधी पक्षांनी विरोध दर्शवला होता.

या विधेयकाच्या मूळ हेतूवाक्यात बदल करून डाव्या विचारसरणीच्या किंवा तत्सम बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध करण्यावर भर देण्यात आला आहे, असे विधेयकासाठी नेमलेल्या संयुक्त समितीने म्हटले आहे. यामुळे सदर विधेयकाचा वापर राजकीय किंवा सामाजिक संघटनांविरुद्ध होणार नाही, असे समितीचे म्हणणे आहे. तसेच कोणत्याही संघटनेला बेकायदेशीर ठरवण्यापूर्वी सल्लागार मंडळाचा निर्णय अनिवार्य करण्यात आला आहे.या सल्लागार मंडळात उच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा निवृत्त न्यायाधीश यांचा समावेश असेल, तर सदस्यांमध्ये जिल्हा न्यायाधीश आणि सरकारी वकील दर्जाचे अधिकारी असतील. यापूर्वी पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे चौकशीची जबाबदारी होती. आता समितीच्या शिफारशीवरून ही जबाबदारी पोलीस उपधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्यात आली आहे. संयुक्त समितीमध्ये जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, अंबादास दानवे यांच्यासह अनेक आमदारांचा समावेश होता.

जनसुरक्षा विधेयकातील महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत. या कायद्यानुसारचे सर्व गुन्हे दखलपात्र आहेत. संघटनांच्या मालमत्तेचा शासनाने ताबा घेतल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात दिवाणी किंवा फौजदारी दावा करता येणार नाही. जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अधिसूचित जागेत प्रवेश केल्यास तो फौजदारी प्रवेश मानला जाईल. जो कोणी बेकायदेशीर संघटनेचा सदस्य असेल किंवा संघटनेशी संबंधित कृत्यांमध्ये भाग घेईल, त्यास, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि तो, तीन लाख रुपयांपर्यंतच्या दंडास पात्र असेल. एकूणच जनसुरक्षा विधेयकातील तरतुदींचा राजकीय वापर होण्याची शक्यता आहे, असे वाटते. त्यामुळे हे विधेयक संभ्रमात टाकणारे वाटते.

# मुंबई महाराष्ट्राचीच!



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर लिहिलेली कविता सभागृहात वाचून दाखवली आणि ते म्हणाले की, याच कवितेमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची नांदी केलेली आहे. ही कविता वाचण्याचे कारण एवढेच आहे की, चार महिन्यांनंतर भाषणे सुरू होतील, महाराष्ट्रापासून मुंबईला तोडण्याचे षडयंत्र सुरू झालेले आहे, असा टोला फडणवीसांनी विरोधकांना लगावला. मुख्यमंत्री फडणवीस असे अनेकवेळा विरोधकांवर शाब्दिक हल्ला करत असतात. त्यात त्यांना आनंद मिळतो. शाब्दिक हल्ला केला, असा वाक्यप्रचार आम्ही का लिहिला ? याचे कारण म्हणजे विधानसभेत आता आमदारांमध्ये सरळसरळ हल्ले होत आहेत, हे काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राने अनुभवले आहे. लोकप्रतिनिधी मुद्द्यांवरून गुद्द्यांवर येत आहेत. त्यामुळे विधानसभेचे पावित्र्य नष्ट झाले, राज्य सरकारवर, मुख्यमंत्र्यांवर जनतेकडून टीकाही झाली. असो. जे गेली पाच वर्षे सुरू झाले आहे, ते प्रत्यक्षात पाहायला मिळाले. पूर्वीच्या नेत्यांनी जे केले नव्हते, ते आत्ताच्या नेत्यांनी करून दाखवले.



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा भाजपचा डाव असल्याचा मुद्दा विरोधकांकडून सातत्याने मांडला जातो. याच मुद्द्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ठणकावून सांगितले की, मुंबई महाराष्ट्राचीच आहे. कुणाचा बाप आला, बापाचा बाप आला, त्याचा आजोबा आला तरी मुंबई महाराष्ट्राचीच राहील, अशी रोखठोक भूमिका मुख्यमंत्री फडणवीसांनी यांनी सभागृहामध्ये मांडली. फडणवीस हे पट्टीचे वकील आहेत. त्यांना शब्द कुठे, कसे वळवायचे हे चांगलेच ठाऊक आहे. फडणवीस हे बोलत बोलत कुणाची विकेट कशी पाडतील, याचा नेम नाही. एखादे वाक्य म्हटले आणि त्या वाक्यावर घमासान होऊन द्यायची आणि नंतर म्हणायचे की, मी असे काही म्हणालोच नाही किंवा माझ्या त्या वाक्याचा अर्थ तसा नव्हता, विरोधक भलताच अर्थ काढतात.



अंतिम आठवडा प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत उत्तर दिले. मुंबईच्या विकासाबद्दल त्यांनी राज्य सरकारची भूमिका मांडली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, प्रत्येकवेळी वर्ष-दीड वर्षांनी आलेल्यांना मुंबई बदलेली पाहायला मिळते. अण्णाभाऊ साठेंनी जी व्यथा मुंबईत अनुभवली, ती व्यथा कुणाच्या वाट्याला येऊ नये असा प्रयत्न आपण करतो. म्हणून अण्णाभाऊ साठेंची एक कविता आहे, मुंबईवर. त्यांनी काय अनुभवले, असे म्हणत देवेंद्र फडणवीस ती कविता वाचून दाखवली. निमित्त अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी हे असावे. यानिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची उजळणी फडणवीस यांनी केली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार आणि साहित्यातील देशप्रेम लक्षात घ्यायला अनेक वर्षे लागतात. फडणवीस यांना लोकशाहीरांच्या कवितेतून महाराष्ट्र प्रेम दिसले, हे विशेष !

फडणवीस यांनी लोकशाहिरांच्या कवितेबद्दल म्हटले की, याच कवितेमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची नांदी केलेली आहे. ही कविता वाचण्याचे कारण एवढेच आहे की,चार महिन्यांनंतर भाषणे सुरू होतील, महाराष्ट्रापासून मुंबईला तोडण्याचे षडयंत्र सुरू झालेले आहे, असा टोला फडणवीसांनी विरोधकांना लगावला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, एस. एम. जोशी, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, नाना पाटील, प्र. के. अत्रे इ. महाराष्ट्रप्रेमींनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोठे योगदान दिले. त्यांच्या आंदोलनामुळे महाराष्ट्राला मुंबई परत मिळाली. मुख्यमंत्री फडणवीस यांना वरील महाराष्ट्रप्रेमी आंदोलक नेत्यांचे योगदान माहीत आहे, हेही विशेष होय. असो. माणसाला कधी कधी कळते पण वळत नाही, असे म्हणतात. तशीच गत मुख्यमंत्री फडणवीसांची झाली आहे की काय, अशी शंका न आल्यास नवल ! याचे कारण म्हणजे मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्र सरकारचा त्रिभाषासूत्री हा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. पहिलीपासून ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सक्तीने हिन्दी शिकविण्याचा निर्णय मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांनीच घेतला. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानंतर मराठी माणसांनी जे अभूतपूर्व आंदोलन केले, ते मुख्यमंत्र्यांना ज्ञात आहेच. आता प्रश्न असा निर्माण होतो की, महाराष्ट्रात मराठी भाषा आणि मराठी माणूस खूप महत्वाचे आहेत. ज्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महाराष्ट्राला मराठी माणसाच्या हक्काची मुंबई मिळाली, तिला महाराष्ट्रापासून तोडण्याचे पाप कुणीही करणार नाही, या वाक्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण देण्याची गरज नाही.

फडणवीस पुढे म्हणाले की, आताच सांगतो. मुंबईला महाराष्ट्रापासून कोणीही तोडू शकत नाही. कुणाचा बाप... बापाचा बाप... त्याचा बाप... त्याचा बाप... त्याचा आजोबा आला तरीही मुंबई महाराष्ट्राचीच आहे. मुंबई महाराष्ट्राचीच राहील आणि हजारो पिढ्या राहील. या महाराष्ट्रात आणि मुंबईमध्ये मराठी माणसाचा आवाज बुलंद राहील, असे फडणवीस विधानसभेत बोलताना म्हणाले. विरोधकांवर टीका असो किंवा काही असो. परंतु फडणवीसांचे हे शब्द मराठी माणसामुळेच अभंग राहतील, हे नक्की !

# प्रगल्भ व युवा नेतृत्व



महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष, राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष,युवा नेते प्रतिकदादा पाटील यांचा आज शनिवार दि.१९ जुलै रोजी वाढदिवस..त्यानिमित्त चार शब्द !!

लोकनेते राजारामबापू पाटील, माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्यानंतर तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून प्रतिकदादा पाटील वाळवा तालुक्याच्या, सांगली जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनात कार्यरत झाले आहेत. स्व.बापूंनी वाळवा तालुक्याला विधायक वळण दिले, विविध सहकारी संस्थांच्या जाळे विणून वाळवा तालुक्यातील सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावले.. स्व.बापू खऱ्या अर्थाने वाळवा तालुक्याचे भाग्यविधाते ठरले आहेत. आ.जयंतराव पाटील हे बापूंच्या अकाली निधनाने आपले उच्च शिक्षण बाजूला ठेवून वाळवा तालुक्यातील सर्व सामान्य जनता आणि कार्यकर्त्यांच्या आग्रहा खातर सार्वजनिक व राजकीय जीवनात आले.. त्यांनी स्व.बापूंनी उभा केलेल्या सहकारी संस्था जीवापाड जपत या संस्थांचा विस्तार केला. त्यांनी वाळवा तालुक्यातील शिवारात पाणी आणून वाळवा तालुक्याच्या प्रगतीस क्रांतिकारक चालना दिली आहे. वाळवा तालुक्याची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व वैचारिक प्रगती ही त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा साक्ष आहे.. त्यांनी राज्याच्या मंत्रीमंडळात अर्थ, गृह, ग्रामविकास व जलसंपदा अशा महत्वाच्या खात्यांची जबाबदारी पेलताना राज्याच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान केलेले आहे. एक अभ्यासू, स्वच्छ व चारित्र्यसंपन्न नेता म्हणून राज्यात त्यांची ओळख आहे आणि हाच समृद्ध वारसा घेऊन प्रतिकदादा पाटील सार्वजनिक क्षेत्रात काम करीत आहेत.





राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना हा वाळवा तालुक्याच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. ही तालुक्यातील एक मातृ संस्था आहे. या संस्थेच्या अध्यक्षपदी प्रतिकदादा पाटील यांची निवड झाल्यानंतर त्यांनी ऊस उत्पादक सर्वसामान्य शेतकऱ्यां च्यासाठी ठिबक सिंचन योजना,सच्छिद्र पाईप निचरा प्रणाली, ऊसाची २५ लाख शुध्द रोपे शेतकऱ्यांना बांध पोच,अल्प दरात शेती साहित्य आदी विविध योजना सुरू केल्या आहेत. त्यास शेतकऱ्यांना चा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत नेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ड्रोन द्वारे औषध फवारणी आणि त्याच्या पुढे जाऊन मल्टी स्पेक्ट्रम ड्रोनचा वापर करणारा राजारामबापू साखर कारखाना हा देशातील पहिला साखर कारखाना आहे.. यातून त्यांची दूरदृष्टी आणि शेतकऱ्यांच्या हिताची तळमळ दिसून येते.. आपल्या परिसरातील मुले व मुलींनी उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभा राहावे,या भावनेने त्यांनी राजारामबापू इंडोमेन्ट ट्रस्ट मधून आर्थिक सहाय्य योजना पुन्हा सुरू केली आहे. कारखान्यातील अधिकारी व कामगार अधिक अपडेट हवे, म्हणून त्यांच्या संकल्पनेतून विविध ट्रेंनिग आयोजित केली जात आहेत. इतकेच नव्हे,तर साखर नेण्यासाठी साखर कारखान्यावर आलेल्या सभासदांना सावली, पिण्याचे पाणी आणि शौचालयासारख्या सुविधा मिळतात का? याकडे ही बारीक लक्ष देत या सुविधा उभा केल्या आहेत.

प्रतिकदादा हे गेल्या काही महिन्यापासून गावोगावी संपर्क दौरा करून ऊस उत्पादक सर्वसामान्य शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत, त्यांच्या अडी-अडचणी समजून घेत आहेत.. यातून ऊस उत्पादक शेतकरी आणि कारखान्याच्या सभासदांशी असलेले जिव्हाळ्याचे ऋणानुबंध अधिक दृढ केले जात आहेत.

स्व.बापू व आ.जयंतराव पाटील यांनी वाळवा तालुक्यात सशक्त व बलवान युवा पिढी निर्माण व्हावी, या भावनेने कुस्ती, कबड्डी, व्हॉलीबॉल आदी विविध खेळांना सातत्याने प्रोत्साहन व पाठबळ दिले आहे. हाच वारसा कायम ठेवत दादांनी खेळ व खेळाडूंना ताकद देण्याचे काम सुरू केले आहे.. त्यांच्या पुढाकाराने नुकतेच राजारामबापू इनडोअर स्टेडियममध्ये अद्यावत जीम सुरू करण्यात आली आहे. या जीममध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोई-सुविधा देण्यात आल्या आहेत. राजारामबापू कुस्ती केंद्रातील मल्लांच्या मानधन कुस्ती स्पर्धा सुरू केल्या आहेत. राजारामबापू क्रीडा संकुलातील खुल्या मैदानावर दररोज सुमारे २-३ हजार युवक स्पर्धा परीक्षेचा सराव करतात..या युवकांना दादा सातत्याने प्रोत्साहन देत असतात. इनडोअर स्टेडियममधील शेकडो युवक दादांच्या मार्गदर्शनाखाली बॅडमिंटनमध्ये जिल्हा व राज्यस्तरावर चमकदार कामगिरी करीत आहेत.

दादा हे शांत,संयमी,मायाळू व हळव्या मनाचे आहेत. त्यांनी मुक्या प्राण्यांच्यावर उपचार करण्यासाठी सारथी ॲनिमल रेस्क्यू सेंटर सुरू केलेले आहे. या सेंटरमध्ये आजारी व अपघातग्रस्त प्राण्यांच्यावर उपचार करून त्यांचा सांभाळ केला जातो.. दादांची सार्वजनिक कार्याची सुरुवात ही जयंत दारिद्र्य निर्मूलन अभियानच्या माध्यमातून झाली आहे. जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले,तोच साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा, या संत युक्तीप्रमाणे वाळवा तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील गोर-गरीब जनतेच्या उन्नतीसाठी,त्यांच्या आरोग्य, शिक्षण,स्वयंरोजगारासाठी दादा अहोरात्र काम करीत आहेत. वाळवा तालुक्यातील सर्व सामान्य जनतेस अद्यावत आरोग्य सुविधा देण्यासाठी त्यांच्या पुढाकाराने कापुसखेड नाका येथील नर्सिंग कॉलेजमध्ये श्रीमती कुसुमताई आरोग्य केंद्र (ओपीडी) सुरू करण्यात आली आहे...वाळवा तालुक्यातील युवा उद्योजक व व्यावसायिकांना प्रोत्साहन आणि पाठबळ देण्यासाठी त्यांच्या दुरदृष्टीतून सुरू केलेली इस्लामपूर बिझनेस फोरम (आय बी एफ) ही संस्था आज राज्या तील एक नामवंत संस्था म्हणून ओळखली जाते.. त्यांच्या नेतृत्वाखाली सध्या तालुक्या मध्ये युवकांचे मजबूत संघटन उभा राहीले आहे.. समाजातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, युवक, महिला आणि उपेक्षित, गोर-गरीब वर्गाच्या प्रगतीसाठी ते कष्ट घेत आहेत. स्व.बापूंना तालुक्यातील जनतेचे अलोट प्रेम मिळाले.. आ.जयंतराव पाटील यांचे नेतृत्व तालुक्यातील जनतेने तळहाता वरील फोडाप्रमाणे जपले आहे.. तेच प्रेम आणि आशिर्वाद प्रतिकदादांना मिळत आहेत.. हे युवा नेतृत्व असेच अधिक भरत जावो आणि त्यांच्या हातून वाळवा तालुका, सांगली जिल्हा आणि महाराष्ट्र राज्यातील जनतेची उत्तम सेवा घडो,याच त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!!

## जुगार प्रकरणी दोनजणांवर कारवाई

***सातारा/प्रतिनिधी:***

जुगार प्रकरणी पोलिसांनी दोनजणांवर कारवाई केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, जुना मोटर स्टॅन्ड येथे पोलिसांनी जुगार अड्ड्यावर छापा टाकून दोघांवर गुन्हा दाखल केला. संजय मारुती भोसले (वय ५३, रा. एकसळ ता.कोरेगाव) व चंद्रमणी धनंजय आगाणे (वय ३५, रा. कोडोली, सातारा) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी ४५० रुपये व जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

## इस्लामपूर आता होणार ईश्वरपूर..!

**पान १ वरुन**

माजी मंत्री आ.सदाभाऊ खोत त्यांनी आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी इस्लामपूरचे ईश्वरपूर होण्यासाठी सरकारने ठराव करावा अशी मागणी केली. या विषयाला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्याची माहिती देतांना नामकरणाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेसाठी पाठवणार असल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी सभागृहात सांगितले.

इस्लामपूर नगरपालिकेच्या सभागृहात नामकरण करण्याबाबत तत्कालीन शिवसेनेचे नगरसेवक आनंदराव पवार यांनी आग्रही भूमिका घेतली होती. याला नगराध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील यांनी सकारात्मक पाठींबा दिला होता. इस्लामपूरचे ईश्वरपूर नामकरण करण्यासाठी त्यांनी विशेष सभा बोलावली होती. शहरात ३५ हजारांहून अधिक नागरिकांनी ईश्वरपूर नामकरण करण्यासाठी सह्या केल्या होत्या. या सह्या वाजत गाजत नगरपालिकेच्या सभेत दाखल झाल्या होत्या. तेव्हा कार्यकर्ते जल्लोषात नगरपालिकेच्या आवारात आले होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंदराव पवार यांनी उद्धव ठाकरे व एकनाथ शिंदे या तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला होता. याबाबत आमदार सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे मागणीही केली होती. दोन महिन्यांपूर्वी नगरपालिका प्रशासनाला शासनाकडून पत्रव्यवहार झाला होता. याला प्रतिसाद देताना जिल्हा प्रशासनाने शासनाला प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार आज विधिमंडळाच्या अधिवेशनात इस्लामपूर आतां ईश्वरपूर होणार हे शिक्कामोर्तब झाले.

## लोकमंगल कृषी महाविद्यालयात पोस्टर व मॉडेल द्वारे विद्यार्थ्यांनी केळी पिकाचे शास्त्र मांडले

***सोलापूर/प्रतिनिधी:***

लोकमंगल कृषी महाविद्यालयात जागतिक युवा कौशल्य दिवस साजरा करण्यात आला. यावेळी पोस्टर व मॉडेल द्वारे विद्यार्थ्यांनी केळी पिकाचे शास्त्र मांडले आणि त्याचे महत्व विषद केले.

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजना एककांतर्गत दिनांक १५ जुलै रोजी जागतिक युवा कौशल्य दिवस केळी पीक आधारित पोस्टर आणि मॉडेल प्रदर्शनाच्या उल्लेखनीय आयोजनाने संपन्न झाला. जागतिक पातळीवर युवकांच्या सक्षमीकरणासाठी हा दिवस युवा कौशल्य दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. याच दिनाचे औचित्य साधून अंतिम वर्षातील मॉड्युल मधील विद्यार्थ्यांनी, युवकांच्या संकल्पनेतून केळी पीक आधारित पोस्टर आणि मॉडेल्स सादरीकरण केले.



महाविद्यालयामध्ये अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गांडूळ खत निर्मिती, रेशीम शेती, रोपवाटिका व्यवस्थापन, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, भाजीपाला उत्पादन, जैविक खते निर्मिती, मशरूम उत्पादन आणि माती पाणी तपासणी इत्यादी मॉड्यूल उत्कृष्ट पद्धतीने राबविले जातात. याच मॉड्युल मधील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर व मॉडेल मधून केळी पिकासाठी जमिनीची मशागत, अवजारे, केळीच्या जाती, पाणी व्यवस्थापन, कीड व्यवस्थापन, खतांचा वापर, काढणी, काढणी पश्चात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन, केळी प्रक्रिया आणि केळी निर्यात इत्यादी सर्व बाबी स्तुत्य पद्धतीने प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. सदरील प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, सर्व संलग्नित विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी विद्यार्थिनींच्या उपस्थितीत केळी खोड पूजन आणि फीत कापून करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टर द्वारे केळी पिकाबाबत तंत्रशुद्ध आणि शास्त्रोक्त माहितीबाबत सर्वांना जागृत केले. सदरील प्रदर्शनास महाविद्यालयातील सर्व व विद्यार्थ्यांनी भेट देऊन केळी विषयी वैज्ञानिक माहिती आणि आधुनिक तंत्रज्ञान याबाबत ज्ञान संपादन केले.

लोकमंगल कृषी तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट देवुन केळी पिकातील बारकावे जाणून घेतले. या प्रदर्शनास अंतिम वर्षातील मॉड्युल मधील ४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषिदुत गणेश केदार याने केले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अजित कुरे, सर्व स्वयंसेवक, महाविद्यालयाचे मॉड्यूल प्रमुख आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लाहोटी कन्या शाळेत विज्ञान छंद मंडळाचे उद्घाटन

***कोळे/प्रतिनिधी : -***

येथील लाहोटी कन्या प्रशालेत विज्ञान छंद मंडळाचे उद्घाटन करण्यात आले.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विज्ञान छंद मंडळाचे पहिले पुष्प प्रशालेची माजी विद्यार्थिनी आणि ङ.इ. ड. कॉलेज, सातारा येथे कार्यरत असणाऱ्या प्रा. अमृता भंडारे - मोरे यांच्या हस्ते गुंफण्यात आले.



विद्यार्थिनींना प्रयोगशाळेतील आधुनिक वैज्ञानिक उपकरणांची ओळख आणि उपयोगिता माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून आयोजित करण्यात आलेल्या 'विज्ञान साहित्य प्रदर्शना'चे उद्घाटन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका हेमलता जंगम, विज्ञान विभाग प्रमुख संगीता शेवाळे आणि सर्व विज्ञान शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका हेमलता जंगम यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यार्थिनींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती निर्माण करण्यासाठी शाळेमध्ये वर्षभर विज्ञान छंद मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

प्रमुख अतिथी अमृता भंडारी - मोरे यांनी आपल्या व्याख्यानांमधून वंडर्स इन सायन्स या विषयावर आपले विचार मांडले. विज्ञानाची सांगड आपल्या रोजच्या जीवनाशी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. निसर्गातील जैवविविधता, प्राणी, वनस्पती मधील विविध अन्नसाखळीचे महत्व, वातावरणात होणारे बदल याचे जैवविविधतेवर होणारे परिणाम याबाबत सखोल माहिती दिली. तसेच आपल्या परिसरातील सापांच्या विषारी, बिनविषारी जातींची स्लाईड शो द्वारे माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी सिद्धी कदम, प्रमुख अतिथींचा परिचय शमिका काळे आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अदिती वडगावकर, श्रावणी गायकवाडने आभार मानले.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# पत्नीला जाळून मारल्याप्रकरणी पतीला अटक

## पत्नी प्रियकरासोबत सापडली जिवंत सोलापूरातील धक्कादायक प्रकार:मग गवताच्या गंजीत सापडलेला मृतदेह कोणाचा ?

**सोलापूर/प्रतिनिधी:**
आपल्या पत्नीला जाळून मारल्याच्या आरोपाखाली पतीला अटक करण्यात आल्यानंतर सदर महिला तिच्या प्रियकरासोबत चक्क जिवंत सापडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

पत्नीला जाळून मारल्याप्रकरणी पतीला अटक होती, परंतु पत्नी प्रियकरासोबत जिवंत सापडली असल्यामुळे खळबळ उडाली आहे, सोलापूरातील हा धक्कादायक प्रकार मंगळवेढे तालुक्यातील एका गावात घडला आहे

पत्नीला जाळून मारल्याच्या आरोपाखाली पतीला अटक करण्यात आल्यानंतर सदर महिला तिच्या प्रियकरासोबत जिवंत सापडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे घडलेल्या या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. या प्रकरणात एका महिलेचा मृतदेह घराजवळ असलेल्या गवताच्या गंजीत जळालेल्या अवस्थेत सापडला होता. त्यानंतर या महिलेच्या पतीनेच तिला जाळून मारल्याचा आरोप झाल्याने तिच्या पतीला अटक करण्यात आली होती. मात्र नंतर ही महिला साताऱ्यामध्ये एका व्यक्तीसोबत सापडली, त्यामुळे या प्रकरणाला वेगळंच वळण लागलं आहे. तसेच घराजवळ जळालेल्या स्थितीत सापडलेला मृतदेह कुणाचा होता, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथील दशरथ दांडगे यांची मुलगी किरण हिचा विवाह नागेश सावंत याच्याशी झाला होता. त्यांना एक दोन वर्षांची मुलगीही आहे. दरम्यान, १४ जुलै रोजी पहाटेच्या वेळी दशरथ दांडगे यांना किरण हिच्या सासरहून तिच्या चुलत सासऱ्यांचा फोन आला. त्यांनी किरण हिने स्वत:ला पेटवून घेतल्याची माहिती दिली. त्यानंतर किरण हिच्या माहेरच्या मंडळींनी तिच्या सासरी धाव घेतली.

तिथे गेल्यावर किरण हिने घराबाहेर स्वत:ला जाळून घेतले. गवताच्या पेटलेल्या गंजीत तिचा मृतदेह सापडल्याचे तिचा पती नागेश याने सासरे दशरथ दांडगे यांना सांगितले. मात्र या प्रकरणात काहीतरी काळंबेरं असावं या संशयाने किरण हिच्या माहेरच्या मंडळींनी पोलिसांत तक्रार दिली होती. त्यानंतर या प्रकरणात पोलिसांनी किरणचा पती नागेश याला अटकही केली.

मात्र पोलिसांनी अधिक तपास सुरू केल्यावर या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली. ज्या किरण नावाच्या महिलेचा जळून मृत्यू झाला असा दावा केला जात होता ती




साताऱ्यामध्ये एका व्यक्तीसोबत जिवंत सापडली. तसेच ती व्यक्ती तिचा प्रियकर असल्याचे सांगण्यात येत आहेत. त्यामुळे आता या महिलेच्या घराजवळ गवताच्या गंजीत सापडलेला मृतदेह नेमका कुणाचा? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पोलिसांनी हा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदन आणि न्यायवैद्यकीय तपासणीसाठी पाठवला आहे. आता त्याचा अहवाल आल्यानंतरच याबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरं मिळण्याची शक्यता आहे.

# पिंपोडे बुद्रुक येथील निकम बंधूचा अजित पवार गटात प्रवेश

**सातारा/प्रतिनिधी:**
उत्तर कोरेगावात राजकीय भूकंप झाला असून राष्ट्रवादी कॉंग्रेस रामराजे निंबाळकर गटाला मोठा धक्का.बसला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमी वर पिंपोडा बुद्रुक येथील श्री विजयराव निकम एचपी गॅस एजन्सी चे मालक व सुरेश निकम मा. सोसायटी चेअरमन ज्येष्ठ नेते भरत साळुंखे तसेच नांदवळ आणि घिगेवाडी ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य तसेच विकास सेवा सोसायटीचे चेअरमन व्हाईस चेअरमन पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पवार गटात जाहीर प्रवेश केला.



नांदवळ ग्रामपंचायतीच्या सरपंच अरुणा बेसके उपसरपंच सचिन पवार ज्येष्ठ नेते प्रकाश आप्पा शिंदे सदस्य प्रकाश रासकर राहुल ठोंबरे संगीता भोसले जयश्री भोसले पुष्पा पवार सूर्यकांत पवार विकास सेवा सोसायटीचे व्हाईस चेअरमन दत्तात्रय पवार संचालक दत्तात्रय बबन पवार रघुनाथ पवार अभिमन्यू भोसले तसेच घिगेवाडी ग्रामपंचायत सरपंच नारायण सावंत माजी सरपंच आदिनाथ सावंत विकास सेवा सोसायटीचे चेअरमन धनसिंग सावंत व्हा.चेअरमन भरत घिगे लक्ष्मण सावंत उपसरपंच व सदस्यांनी आज जिल्हाध्यक्ष मा. श्री बाळासाहेब सोळसकर युवा नेते प्रवीण निकम यांच्या नेतृत्वाखाली आज मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

# राज्य शासनाचे ‘मेक इन महाराष्ट्र नॅचरल फ्लॉवर्स’ धोरण

## ना.शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीवरून मंत्री पंकजा मुंडे यांचा सकारात्मक निर्णय

**सातारा/प्रतिनिधी:-**
राज्यातील शाश्वत शेती आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी कृत्रिम प्लास्टिक फुलांच्या वापरावर निर्बंध आणण्याच्यादृष्टीने एक महत्त्वपूर्ण बैठक गुरूवारी विधानभवन येथे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. मंत्री व आमदारांनी केलेल्या सुचनांचा विचार करून राज्य शासन कृत्रिम फुलांबाबत स्वतंत्र निर्णय घेण्याचा विचार करणार असून 'मेक इन महाराष्ट्र नॅचरल फ्लॉवर्स' धोरण अंमलात आणण्यासाठी सकारात्मक असल्याचे ना. पंकजा मुंडे यांनी सांगितले.

बैठकीला रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री ना. भरतशेठ गोगावले, आ. महेश शिंदे, आ. सुनील शेळके, आ. अमल महाडिक, आ. रोहित पाटील, आ. विश्वजीत कदम यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मंत्री व आमदारांनी कृत्रिम



फुलांच्या वाढत्या वापरामुळे राज्यातील फूल उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याबाबत चिंता व्यक्त केली.

सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, राज्यात कृत्रिम फुलांच्या बाबतीत उत्पादन, आयात, विक्री व नियमन आणण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करावे. कृषी फुलांचा वापर वाढवणाऱ्या शासकीय व सार्वजनिक उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे. कृषी फूल उत्पादक शेतकर्यांसाठी अनुदान, प्रशिक्षण आणि हरितगृह तयार करण्यासाठी सवलती द्याव्यात. पर्यावरण व आरोग्य विषयक अभ्यास समितीमार्फत कृत्रिम फुलांचे दुष्परिणाम यावर सखोल शास्त्रीय अहवाल तयार करावा. 'मेक इन महाराष्ट्र नॅचरल फ्लॉवर्स' अशा अभियानाच्या माध्यमातून कृषी फुलांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. विशेषत: झेंडू, गुलाब, जास्वंद यासारख्या पारंपरिक फुलांच्या मागणीत घट झाली आहे. राज्यातील शेतकरी गुलाब, झेंडू, जास्वंद, ट्युलिप, कार्नेशन, रजनीगंधा इत्यादी निर्यातक्षम फुलांची उत्पादन क्षमता विकसित करत आहेत. हरितगृह शेती करणार्या शेतकर्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. कृत्रिम फुलांचे उत्पादन प्रामुख्याने न विघटनशील घटकांपासून म्हणजे पॉलीस्टर, नायलॉन, प्लास्टिक आणि सिंथेटिक रंगांपासून होते. त्यामुळे त्याचा पर्यावरणावर दीर्घकाळ विपरीत परिणाम होतो. जलप्रदूषण आणि मातीच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. अशा फुलांवर वापरली जाणारी रसायने मानवी आरोयालाही धोका निर्माण करत आहेत, याकडे मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले यांनी लक्ष वेधले.

पर्यावरण मंत्री ना. पंकजा मुंडे म्हणाल्या, शेतीसाठी अनुकूल धोरणे राबवणे आणि पर्यावरणाचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे. कृत्रिम फुलांवर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र धोरण आखण्याबाबत विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

रोजगार हमी मंत्री ना. भरत गोगावले म्हणाले, हरितगृह शेती, ठिबक सिंचन, नियंत्रित तापमान या आधुनिक पद्धतींचा वापर करून शेतकरी फुलांची निर्यातक्षम उत्पादन क्षमता वाढवत आहेत. यावेळी कृत्रिम फुलांचा अनियंत्रित वापर हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला मारक असल्याचे त्यांनी सांगितले.

# उद्योग व व्यवसाय वृध्दींगत करण्यासाठी जिल्हा पोलीस दल सहकार्य करेल

## पोलीस अधीक्षक तुषार दोशी

**सातारा/प्रतिनिधी : -**
सातारा जिल्ह्यातील सर्व ठिकाणचे उद्योग व व्यवसाय अधिक चांगल्यारितीने वृध्दंगत करण्यासाठी सातारा जिल्हा पोलील दल सदैव तत्पर राहून सर्वतोपरी सहकार्य करेल, असे आश्वासन पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी दिले.

सातारा जिल्ह्यातील विविध औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या पोलीस विभागाशी संबंधित असलेल्या समस्या व अडीअडचणी व त्यावर करावयाच्या योजनांच्या संबंधाने पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्या अध्यक्षतेखाली अलंकार हॉल सातारा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर, सातारा उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले, कराड उपविभागीय अधिकारी अमोल ठाकुर, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे, महाराष्ट्र औद्योगिक संघटनेचे (मास) अध्यक्ष संजोग मोहीते, उपाध्यक्ष अनुप मुथा, सचिव दिपक पाटील उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यातील उद्योजकांनी मांडलेल्या अडचणींबाबत सातारा जिल्हा पोलीस दलाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनेबाबत पोलीस अधीक्षक श्री. दोशी यांनी चर्चा करुन डायल ११२ बाबत माहिती देऊन याचा जास्तीत जास्त वापर करण्यास सांगितले. आद्यौगिक परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या कक्षेत आणण्याबाबत सूचना दिल्या. या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेबाबत अंतर्गत सुरक्षा समिती स्थापन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# कराड अर्बनची रविवारी वार्षिक सर्वसाधारण सभा: डॉ. सुभाष एरम

**कराड/प्रतिनिधी : -**
दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराडची १०८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २० जुलै रोजी पंकज मल्टीपर्पज हॉल, कराड येथे आयोजित केली असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष एरम यांनी दिली.

कराड अर्बन बँकेस रिझर्व्ह बँकेकडून आणखीन पाच नवीन शाखा उघडण्याची परवानगी मिळाली आहे. आता सध्या एकूण ६७ शाखा कार्यरत असून, नवीन पाच शाखांमुळे ७२ शाखा होणार आहेत. बँकेने मागील काळात ठेवलेली उद्दिष्टये ५८०० कोटी व्यवसायपूर्ती, शून्य टक्के एनपीए, मोबाईल बँकिंग सेवा, यूपीआय सेवा अशी सर्व उद्दिष्टये पूर्ण झाल्याचा आनंद होत असल्याचे सांगत रविवार सकाळी ११.३० वा. पंकज मल्टीपर्पज हॉल, हॉटेल पंकजचे मागे, कोल्हापूर नाक्याजवळ, कराड येथे आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेला सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष डॉ. एरम केले आहे.

यावेळी माजी अध्यक्ष व ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी, उपाध्यक्ष समीर जोशी, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल लाहोटी, कराड अर्बन कुटुंब सल्लागार सीए. दिलीप गुरव, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. धनंजय शिंगटे व संचालक उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय येथे कुपोषित बालकांसाठी शिबिराचे आयोजित

**कराड/प्रतिनिधी:**
उपजिल्हा रुग्णालय येथे कुपोषित बालकांसाठी शिबिर आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये लहान मुलांचे डॉ.अनिल लाहोटी यांनी पालकांना लहान मुलांना प्रथिने, विटामिन्स, कार्बोहायड्रेट्सयुक्त (अंडी , डाळी, गुळ, पालेभाज्या, फळ)आहार कसा सेवन करावा व कोणते पदार्थ टाळावेत (कुरकुरे , बेकरी पदार्थ) याबद्दल सखोल मार्गदर्शन केले तसेच त्यांनी मोबाईल पासून दूर राहण्यास सल्ला दिला. त्यांनी घएच् हॉस्पिटल मुंबई येथे मोबाईल वश-रववळलींळेप साठी एक वॉर्ड तयार करण्यात आला आहे हे सांगितले.डॉ मनोज जोशी यांनी आहार व मानसिक आरोग्य याबद्दल मार्गदर्शन केले उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुनीला लाळे यांनी रोटरी क्लब कराडचे धन्यवाद दिले व असेच उपक्रम राबवण्यास सांगितले. रोटरी क्लब कराडचे अध्यक्ष रो डॉ शेखर कोगनूळकर यांनी उपस्थित पालकांना आव्हान केले की त्यांनी प्रामाणिकपने आपली जबाबदारी स्वीकारली पाहिजे.त्यांनी स्वतः व मुलांना मोबाईल पासून दूर ठेवावे.

या शिबिराचा लाभ वय वर्ष ३ ते ६ या वयातील एकूण ५० मुलांना झाला. या मुलांची मानसिक व शारीरिक वाढ ही कायमस्वरूपी चांगली रहावी हा उद्देश आहे.

रोटरी क्लब कराड तर्फे सर्व मुलांना नाचणी सत्व,ळीप, कॅल्शियम बॉटल्स, राजगिरा लाडू वाटप करण्यात आले. याठिकाणी रो. डॉ. अस्मिता फासे रो डॉ मनोज जोशी, सेक्रेटरी रो विनायक राऊत रो शिवराज माने रो. आनंदा थोरात,रो प्रबोध पुरोहित कु हर्षला यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या वेळी सातारा येथून आलेल्या डाएटिशियन यांनी मार्गदर्शन केले.तसेच पंचायत समितीच्या लोंढे मॅडम उपस्थित होत्या.या शिबिरासाठी कॉटेज हॉस्पिटल मधील डॉ मोहोळकर,सर्व ठइडज्ञ अधिकारी डॉक्टर्स,सर्व स्टाफ, अंगणवाडी सेविका व आशाताई व इतर कर्मचारी यांनी प्रचंड सहकार्य केले.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरिता राज्यशासनातर्फे राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

## अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २० ऑगस्ट: ५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक

**सांगली/प्रतिनिधी:**
महाराष्ट्र शासनाच्या पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलव्दारेच दि. २० जुलै २०२५ पासून दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील, असे अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे याविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

दिनांक २७ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील.

राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु. २५,०००/- रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे प्रसिध्दी पत्रकान्वये कळविण्यात आले आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी गांवकुसा बाहेरील समाजाला न्याय दिला

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे आपल्या सांगली जिल्ह्याचे सुपुत्र असल्याचा आम्हास सार्थ अभिमान:प्रतिकदादा पाटील

**इस्लामपूर/ प्रतिनिधी:**
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी गांव कुसा बाहेरील उपेक्षित समाजाला न्याय देण्याचे महान कार्य केले असल्याचे गौरवोद्गार राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष,युवा नेते प्रतिकदादा पाटील यांनी काढले. सांगली जिल्ह्याचे सुपुत्र अण्णाभाऊ साठे यांचे नांव व साहित्य साता समुद्रापार गेल्याचा आम्हास सार्थ अभिमान असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली.

इस्लामपूर येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे प्रतिकदादा पाटील यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष शहाजी पाटील,महिला शहराध्यक्षा पुष्पलता खरात,युवक तालुकध्यक्ष संग्राम जाधव,कार्याध्यक्ष देवराज



इस्लामपूर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेच्या पूजन प्रसंगी प्रतिकदादा पाटील. समवेत शहाजी पाटील,पुष्पलता खरात,संग्राम जाधव, देवराज देशमुख,विनायक यादव व मान्यवर.

देशमुख, विनायक यादव प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रतिकदादा पाटील म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे वाळवा तालुक्यातील वाटेगावचे सुपुत्र आहेत, याचा आम्हास सार्थ अभिमान आहे. ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे लेखक व डाव्या विचारसरणीचे आघाडीचे नेते होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत केलेले कार्य महान आहे. युवा पिढीने त्यांचे चरित्र व कार्याचा अभ्यास करून त्यांचे विचार शेवट च्या माणसापर्यंत न्यावे.

प्रा. शामराव पाटील, बाळासाहेब पाटील, विजयराव पाटील, दादासाहेब पाटील, खंडेराव जाधव, सुभाषराव सुर्यवंशी, संजय पाटील, संदीप पाटील, शैलेश पाटील,शंकरराव चव्हाण, शंकरराव पाटील,अनिल पावणे, मनिषा पेठकर, मालन वाकळे, सुनंदा साठे, दिग्विजय पाटील,अभिजित रासकर, अभिजित कुर्लेकर, इंद्रजित पाटील यांच्यासह जेष्ठ,युवक,महिला कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्व.शिवाजीराव देसाई यांचे कर्तृत्व पाहण्यासाठी मरळीच्या माळावर या: जयवंतराव शेलार

**कराड/प्रतिनिधी : -**
लोकनेते स्व. बाळासाहेब देसाई यांच्या कार्यकर्तृत्वाचा वारसा अखंडितपणे पुढे सुरू ठेवण्याचे काम शिवाजीराव (आबासाहेब) देसाई यांनी हयातभर केले. शिवाजीराव देसाई यांचे कार्य समजून घेण्यासाठी पाटण मतदारसंघातील डोंगर कपारीत राहणाऱ्या गोरगरिब वयोवृध्द नागरिकांची भेट घ्या, तसेच त्यांनी अविरत कष्टाने फुलविलेल्या मरळीच्या माळावर या म्हणजे तुम्हाला शिवाजीराव देसाई यांच्या कार्यकर्तृत्वाचा अंदाज येईल, असे आव्हान शिवसेना जिल्हा प्रमुख जयवंतराव शेलार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

तसेच पाटण विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेने खा. संजय राऊत यांनी केलेल्या



बेताल व अर्थहीन वक्तव्याचा जयवंतराव शेलार यांनी जाहीर निषेध व्यक्त केला.

श्री. शेलार यांनी या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, स्व. शिवाजीराव देसाई यांच्यावर आपल्या वडिलांचा म्हणजेच लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव होता. मुंबईमध्ये शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी मुंबईमध्येच व्यवसायास सुरूवात केली. व्यवसायामध्ये स्थिरस्थावर झालेले असतानाच बाळासाहेब देसाई यांनी शिवाजीराव देसाई यांना पाटण मतदारसंघाची जबाबदारी दिली. त्यांच्या आदेशाने त्यांनी आपल्या व्यवसायाचा त्याग करून पाटणच्या जनतेची सेवा करण्याची जबाबदारी स्वीकारली. पाटणमध्ये आल्यावर शिवाजीराव देसाई यांनी तालुक्यातील लोकांच्या हाती काम मिळावे, शेतमालाला हमीभाव मिळावा, ऊसासारखे शेतात पीक घेवून त्यांच्या हाती पैसा यावा, हा उद्देश डोळ्यासमोर लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना उभारला.


पाटण तालुका दुर्गम, डोंगराळ म्हणून ओळखला जातो. या तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरिब कुटुंबातील मुलांना शिक्षण घेता यावे व त्यांचे मागासलेपण दूर व्हावे, शिवाजीराव देसाई यांनी सोनवडे या ठिकाणी १९८३ साली मोरणा शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मरळीत दौलत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची स्थापना १९८६ साली केली. आज मोरणा शिक्षण संस्थेचा वटवृक्ष झाला असून हजारो मुलांचे भवितव्य या ठिकाणी घडत आहे.

स्व. शिवाजीराव देसाई यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रश्नचिन्ह उभे करणाऱ्यांनी मरळीच्या माळावर येऊन स्वतःच्या डोळ्याने शिवाजीराव देसाई यांचे कार्यकर्तृत्व पहावे, असे आवाहन करत फक्त मुंबईत बसून आपल्या नेत्याला खुश करण्याचा केविलवाणा प्रयत्न बंद करा. नाहीतर पाटणची जनता तेथे येऊन तुमच्या बुडाला आग लावल्याशिवाय शांत बसणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# विट्यातील भाजीविक्रीत्याची मुलगी एल.एल.बी.उत्तीर्ण

**विटा/प्रतिनिधी:**
सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील विटा मायणी रोडवरील नविन भाजी मंडई मध्ये भाजीविक्रीत्याचा व्यवसाय करणारी एक मायमाऊली याची मुलगी अस्मिता जयपाल मोरे या मुलीने कष्टाचे आणि हालाखीचे जीवन जगत परिस्थितीवर मात करून एक उत्कृष्ट कामगिरी शिक्षण क्षेत्रात उंच भरारी घेत आज एलएलबी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण केले. अस्मिता याची आई विटा भाजी मंडई मध्ये भाजी विक्रीचा व्यवसाय करते.

भाजी विक्रेत्या मनीषा जयपाल मोरे यांनी शून्यातून विश्व निर्माण करून आपल्या मुलीला शिक्षण क्षेत्रामध्ये अत्यंत योग्य सहकार्य करत अस्मिताला भरपूर शिकवले. आईचे स्वप्न होते, माझ्या डोळ्यासमोर माझ्या मुलीने काहीतरी बनावे.



मनीषा मोरे म्हणतात की, आमचे आयुष्य भाजीविक्रीत गेले. पण माझ्या मुलीचे आयुष्य तिने सुखाने जगावे, तिला भरपूर सुख मिळावे, तिचे भरपूर शिक्षण व्हावे आणि तिने उंच भरारी घ्यावी. या अनुषंगाने सतत पाठपुरावा करत अस्मिताच्या आईने काबाडकष्ट केले आणि आपल्या मुलीच्या पाठीशी ठामपणे राहिली आणि अस्मिता जयपाल मोरे हिने एलएलबी यशस्वी करत उत्तीर्ण होऊन आपल्या आई-वडिलांचे, स्वप्न मोरे कुटुंबाचे स्वप्न पूर्ण केले.

यावेळी विटा भाजी मंडईमध्ये आपली मुलगी एलएलबी पास झाली याचा आनंद प्रथमत: आईच्या डोळ्यांत दिसून आला आणि अश्रू अनावर झाले. माझ्या मुलीने फार मोठे परिश्रम घेऊन आज मी दिलेला शब्द पूर्ण केला, अशा शब्दात कौतुक करत विटा भाजी मंडईमध्ये पेढे वाटून आनंद साजरा केला. आपल्या मुलीच्या जीवनात असेच सर्व क्षण आनंदाचे येऊ दे, असे म्हणत आईने तिला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व भाजी विक्रेत्यांनी व महिला वर्गांने अस्मिताच्या भावी वाटचालीला शुभेच्छा दिल्या.

# अडचणीतील शेतकऱ्यांना एकरी ५० हजार द्या

## आ. सचिन कल्याणशेट्टी यांचे सोलर कंपनीस आवाहन:चपळगाव येथील ज्युनिपर सोलर प्लँटचे लोकार्पण

**अक्कलकोट/प्रतिनिधी:**
निसर्गाच्या लहरीपणामुळे अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी अडचणीत आले आहेत.परंतु सोलर कंपनीस शेती भाडेतत्त्वावर दिलेल्या अडचणीतील शेतकऱ्यांना एकरी वार्षिक भाडे ५० हजार देण्याची मागणी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केली आहे.

चपळगाव ता.अक्कलकोट येथील ८०० एकर शिवारात उभारलेल्या १५० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता असलेल्या ज्युनिपर सोलर प्लँटचे लोकार्पण आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पार पडले.यावेळी त्यांनी ही मागणी केली.यावेळी व्यासपीठावर कंपनीचे लँड मॅनेजर सर्वजीतसिंग, डेप्युटी मॅनेजर चेतन जाधव, प्रोजेक्ट हेड दिपक कटियाल,शैलेंद्र सिंग, विजय तिवारी,अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अप्पासाहेब पाटील, सरपंच वर्षा भंडारकवठे, हन्नूरचे उपसरपंच सागर कल्याणशेट्टी, सरपंच प्रदीप पाटील, माजी सरपंच उमेश पाटील,डॉ.काशिनाथ उटगे, सिध्दाराम भंडारकवठे,अभिजीत पाटील,सी.ए.ओंकारेश्वर उटगे, मल्लिनाथ सोनार,राजा कोळी यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे बोलताना कल्याणशेट्टी म्हणाले की,सौर ऊर्जेमुळे देशाच्या पर्यावरणाला पुरक चालना मिळणार आहे.देशहित लक्षात घेऊन चपळगाव भागातील हजारो शेतकऱ्यांनी शेती भाडेतत्त्वावर




दिलेल्या आहेत.यामुळे वाढीव भाडे तसेच भागातील जास्तीत जास्त स्थानिक तरुणांना या ठिकाणी रोजगार मिळावा,ही अपेक्षा आहे.

### आणखी १०० मेगावॉटचा प्रकल्प..

दरम्यान चपळगाव भागात विविध संस्थांनी सोलर प्लँटचे जाळे निर्माण केले आहे.हजारो एकरची शेतजमीन स्थानिकांनी भाडेतत्त्वावर दिली आहे.ज्युनिपरची आणखी १०० मेगावॉट वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेण्यात आल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

# देसाई साखर कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करा

## यशराज देसाई; चेअरमन देसाईंचे हस्ते रोलरचे पुजन

**पाटण/प्रतिनिधी : -**

लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना हा ना. शंभूराज देसाई यांचे मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्रामध्ये चांगली वाटचाल करत आहे. सध्या कारखान्याची विस्तारवाढ पूर्ण झाली असून, यंदाचे गळीत हंगामाची पूर्वतयारी सुरु आहे. कारखान्याने गतवर्षीचा गळीत हंगाम चांगल्या प्रकारे पुर्ण केला होता. यंदाच्या गळीत हंगामातही कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करण्याचे उद्दीष्ट कारखान्याने ठेवले आहे. नियोजनबध्द काम करुन सन २०२५-२६ चा गळीत हंगाम प्रतिवर्षाप्रमाणे यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन चेअरमन यशराज देसाई यांनी केले.

दौलतनगर, ता. पाटण येथील देसाई साखर कारखान्याचे सन २०२५-२६ चे गळीत हंगामासाठी रोलरचे पूजन कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई यांचे शुभ करण्यात आले. यावेळी अशोकराव पाटील, डॉ. दिलीपराव चव्हाण, पांडूरंग नलवडे, भागोजी शेळके, बळीराम साळुंखे, प्रशांत पाटील, सुनील पानस्कर, लक्ष्मण बोर्गे, सर्जेराव जाधव, शशिकांत निकम, बबनराव शिंदे, सोमनाथ खामकर, विजय सरगडे, दिपाली पाटील, जयश्री




कवर, सर्व संचालक, पदाधिकारी, कार्यकारी संचालक एस.एल. देसाई यांच्यासह कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

चेअरमन देसाई म्हणाले, कारखान्याने सन २०२४-२५ चे गळीत हंगामामध्ये २०५००० मे.टन इतके ऊसाचे गाळप करुन सरासरी ११.७१ टक्के साखर उताऱ्याने २,४०,०४० क्विंटल साखर उत्पादन केले आहे. तसेच कारखान्याच्या आगामी गळीत हंगामाकरीता यंत्रसामग्री देखभाल दुरुस्ती आदी कामे प्रगतीपथावर असून येणाऱ्या गळीत हंगामामध्ये कारखाना कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त नोंद केलेल्या ऊसाचे गाळप करण्याचे उद्दीष्ट व नियोजन कारखाना व्यवस्थापनाने केले आहे. गळीत हंगामाची पूर्व तयारी म्हणून मशिनरी विभागाकडील मिलमधील रोलरचे आज पूजन होत आहे. तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करुन ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांना एफआरपीच्या धोरणानुसार ऊसदर देण्याचा मानस व्यक्त केला.



# विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी वैभव पाटील यांच्या प्रयत्नाने परिसरात बसवला नवीन ट्रांसफार्मर

**विटा/प्रतिनिधी:**

गेली अनेक वर्षांपासून डॉ. आंबेडकर नगर, फुले नगर, जोतिबा नगर, मायाक्का नगर व ८० फुटी बायपास रोड परिसर येथे विजेचा लोड कमी असल्यामुळे विजेची उपकरणे चालत नव्हती, त्यामुळे लोकांची कुचंबना होत होती. याबाबत वैभव पाटील यांचेकडे ८० फुटी रोडला नवीन ट्रांसफार्मर बसवणेबाबत मागणी केली होती. लोकांची अडचण व मागणी लक्षात घेऊन पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा करून ८० फुटी रोडलगत नवीन ट्रांसफार्मर बसवून घेतला. आज त्याचे उदघाटन वैभदादा पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रशांत आप्पा कांबळे, भरत कांबळे, माजी नगरसेवक विश्वास तात्या कांबळे, सुरेश कांबळे, सुरज कांबळे, रुद्राप्पा साबळे, रोहन कांबळे, सुमित भंडारे, नंदू भंडारे, आनंद पाटील, रामभाऊ पाटील, पांडुरंग देवर, अरविंद कुलकर्णी, पोरे काका, अभिजित सोनवणे, मानसिंग कांबळे, रणजित कांबळे, विशाल भिंगारदेवे, रामभाऊ यादव, भगवानराव गडदरे, आनंद शिंदे, संजय कांबळे, शितल कांबळे, राजेंद्र कांबळे, सर्जेराव गायकवाड, रमाकांत कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# शालेय नेतृत्वातून भविष्यातील नेतृत्व उभे राहते

## प्राचार्य लतीफ मनेर :आदर्श पब्लिक स्कूल सी.बी.एस.ई.मध्ये विद्यार्थ्यांचा पदग्रहण सोहळा

**विटा/प्रतिनिधी:**

कर्तृत्व आणि नेतृत्व हे शिकवले जात नसून ते अंगभूत कौशल्यातून उदयास येते. उत्कृष्ट नेतृत्व गुण विद्यार्थ्यांच्या अंगी विकसित होऊन भविष्यात ही नवी पिढी आपल्या महासत्ता देशाचे नेतृत्व करेल अशी अपेक्षा प्राचार्य लतीफ मनेर यांनी विद्यार्थ्यांच्या पदग्रहण सोहळ्याच्या कार्यक्रमाप्रसंगी मत व्यक्त केले.

लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित आदर्श पब्लिक स्कूल सी.बी.एस.ई मध्ये चालू शैक्षणिक वर्षाच्या स्टुडंट्स कौन्सिल निवड कार्यक्रम पार पडला. योग्य पदासाठी अर्ज भरणे, प्रचार करणे, आपला आवडता आणि योग्य उमेदवार निवडून देण्यासाठी मतदान करणे आणि शेवटी मतमोजणी या तीन



दिवसाच्या निवड प्रक्रियेनंतर विद्यार्थ्यांनी दिलेल्या मतदानावर स्टुडंट्स कौन्सिलची निवड झाली.

जनरल सेक्रेटरी अथर्व पाटील, हेड बॉय सर्वेश कोळी, हेड गर्ल दिया पाटील, स्पोर्ट कॅप्टन ओकार जाधव, स्पोर्ट व्हाईस कॅप्टन गौतम जाधव, डिसिप्लिन कॅप्टन गौतम चौधरी, डिसिप्लिन व्हाईस कॅप्टन आर्या पाटील, रेड हाऊस कॅप्टन शुभम शिंदे, व्हाइस कॅप्टन आदर्श जाधव, ब्लू हाऊस कॅप्टन प्रणिती शिंदे, व्हाईस कॅप्टन आयुष गडदरे, ग्रीन हाऊस कॅप्टन दानिश गडकरी, व्हाईस कॅप्टन अर्णव कदम, येलो हाऊस कॅप्टन श्रेयस चव्हाण, व्हाईस कॅप्टन अवनी शिंदे, या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्यांच्या हस्ते बॅज व सॅश देऊन गौरवण्यात आले.

# राजवाडा परिसर आटपाडी पेठेच्या आर्थिक स्थैर्याचे केंद्र बनवा

## सादिक खाटीक

**आटपाडी/प्रतिनिधी:**

राजवाडा परिसर !, आटपाडी पेठेच्या आर्थिक स्थैर्याचे मुख्य केंद्र बनवा आणि मुळ आटपाडीच्या मुळावर उठलेल्या समस्या, प्रश्नांसह मुळावर आलेल्यांना वेळीच दुर करा. असे आवाहन आटपाडीचे ज्येष्ट पत्रकार तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार



ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिक खाटीक यांनी केले आहे.

आटपाडीशी प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष संबंध येणाऱ्या बॉटम टु टॉपच्या सर्व अधिकारी - पदाधिकाऱ्यांचे, या अनास्थेकडे लक्ष वेधताना सादिक खाटीक यांनी हे आवाहन केले आहे.

स्वातंत्र्यावेळची आटपाडी आणि स्वातंत्र्यानंतरच्या पंचाहत्तरीतली आटपाडी, या दरम्यानच्या आटपाडी मध्ये विकासात्मक प्रचंड बदल झाला आहे. मात्र या विकासाची सर्वात मोठी झळ, मुळ आटपाडीवर अवकळा आणणारी ठरत असल्याने मुळचे आटपाडीकर पेठकरी, व्यापारी, नागरीक सर्वच बाजुनी निराशेच्या गर्तेत फेकले गेले आहेत. फक्त पैसा अन पैसा, करोडोंच्या राशीतला प्रचंड पैसा मिळविण्याच्या नादाला लागलेल्या अनेक राजकारण्यांना या मुळच्या आटपाडीशी काही देणे घेणे उरलेले नाही. असेच राहून राहून वाटते आहे. मुळ आटपाडीतील अनेक सार्वजनिक व्यवस्था मापटेमळा, धांडोरमळा, पंचायत समिती परिसर, एम.एस.ई.बी लगतच्या शासकीय गोडावूनच्या जागी, अथवा कारखाना रोड लगतच्या शासकीय जागांवर नेण्याचा काही जणांचा प्रयत्न असल्याच्या कथित चर्चेवर भाष्य करताना सादिक खाटीक यांनी आपली भुमिका स्पष्ट केली आहे.

आटपाडी च्या ओढातल्या मुळच्या फरशी पुलापासून धांडोर ओढ्या पर्यंतच्या राजमार्ग रस्त्यालगत असणाऱ्या अनेक शासकीय जागा अनेकांनी ढापल्या आहेत. काही सामान्यांचा, त्या जागांशी कसलाही संबंध नसताना, कुठलेही शासकीय झाले सोपस्कर नसताना, जागा उचकटायच्या म्हणून सातबारावर काहींच्या पोकळ नोंदी चढवून, काही काळाने त्यांच्याकडून खरेदी दस्ताद्वारे खरेदी केल्याचे दाखवत, मुळच्या महाराष्ट्र शासनाच्या जागांवर बोगस नोंदीच्या प्रकाराद्वारे अनेक शासकीय जागांवर बस्तान बसविणारांचे बस्तान नेस्तनाबूत केले पाहीजे. शिवाय या रस्त्या लगतच्या, शासनाच्या परवानगी विना देवस्थान इनाम वर्ग - ३ च्या जागेवर आपले साम्राज उभे करणारांचेही साम्राज्य खालसा करून या सर्व शासकीय जागा सर्व सामान्यांच्या विकासासाठी उपयोगात आणल्या पाहिजेत. मुळ आटपाडी शहरातल्या अनेक अतिक्रमणांवर तातडीने जेसीबी चालवला पाहीजे. रस्ते व इतर सोपस्करांसाठी आटपाडीकरांच्या अधिग्रहण कराव्या लागणाऱ्या जागांचा परतावा राष्ट्रीय महामार्गाला घेतल्या जमिनीच्या दराने संबंधीत नुकसान ग्रस्तांना दिला गेला पाहिजे. असाही आग्रह सादिक खाटीक यांनी शासनकर्त्याकडे धरला आहे.

# नागठाणे कॉलेजमध्ये एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

**नागठाणे/प्रतिनिधी : -**

नागठाणे येथील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने खपर्पेरींश, ऊेलींशपीं, ऊशश्रळींशी: ईीळश्रवळपस र ऊींश्रींीश ेष टींरश्रळीूं रपव - लर्लेींपींरलळश्रळींूं या विषयावर गुरूदेव कार्यकर्त्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, साताराचे इंग्रजी विभागाचे प्रो.(डॉ.) बी.एस. लोकडे होते.

याप्रसंगी बोलताना प्रो.(डॉ.) लोकडे म्हणाले, शैक्षणिक नवोन्मेष,



दस्तावेजीकरणाच्या माध्यमातून जबाबदारी आणि उत्तरदायित्वाची संस्कृती निर्माण होते. शैक्षणिक क्षेत्रामध्ये गुणवत्ता केंद्रित कार्यपद्धती विकासासाठी आवश्यक आहे. नैतिक मूल्ये, पारदर्शकता आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा प्राधान्य देणारी संस्कृती गुरुदेव कार्यकर्त्यांनी अंगीकारणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी चालना देणारे नवोपक्रम राबविणे आवश्यक आहे. भविष्याचा वेध घेत काळासोबत टिकून राहण्यासाठी शिक्षकांनी स्वतः ला अद्यावत करत राहणे, तसेच नवीन तंत्रज्ञानाचा अध्यापन, संशोधनामध्ये वापर करणे आवश्यक आहे.कारण राष्ट्रीय विकासामध्ये शिक्षक अत्यंत मोलाची भूमिका बजावतात.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र प्राचार्य कॅप्टन डॉ. महेश गायकवाड म्हणाले, महाविद्यालये, संस्था आणि विद्यापीठ यांनी एकत्र येऊन नॅक च्या अनुषंगाने दस्तावेजीकरणाच्या बाबतीत एक सुसंगत आराखडा तयार करणे आवश्यक आहे. शिक्षक हा पिढी घडवण्याचे काम करतो, तसेच शिक्षकाची राष्ट्रीय विकासामध्ये अत्यंत मोलाची भूमिका असते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. सुरेश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मनिषा सुतार, आभार इतिहास विभाग प्रमुख डॉ. अजितकुमार जाधव यांनी मानले. सदर कार्यशाळेस महाविद्यालयातील गुरुदेव कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# स.गा.म. कॉलेजच्या स्नेहल सूर्यवंशीचे सी.एस. फाउंडेशन परीक्षेत यश

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील सदुरु गाडगे महाराज ज्युनिअर कॉलेजमधील (कॉमर्स विभाग) स्नेहल शशिकांत सूर्यवंशी या विद्यार्थिनींने सी.एस. परीक्षेत २०० पैकी १४२ गुण मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे. तिच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व स्थानिक व्यवस्थापन समितीचे प्रमुख अॅड. रवींद्र पवार आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांनी तिचे अभिनंदन केले. यावेळी माजी उपप्राचार्य आर.वाय. पाटील,



उपप्राचार्य एस. एस. नांगरे, कॉमर्स विभागप्रमुख प्रा.एस.एस. पवार, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

स्नेहल सूर्यवंशीला ज्युनिअर विभागाचे माजी उपप्राचार्य आर.वाय. पाटील, उपप्राचार्य एस.एस. नांगरे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.एस.एस. पवार, तसेच वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

# एस.एम.एस इंग्लिश मिडीयम स्कूल एस.डी.जी स्कूल २०२५ पुरस्काराने सन्मानित

**कराड/प्रतिनिधी : -**

येथील एस.एम.एस. इंग्लिश मिडीयम स्कूलला भारत सरकारच्या नीती आयोगांतर्गत नोंदणीकृत सेंटर फॉर एज्युकेशनल डेव्हलपमेंट (उएऊ) फाऊंडेशनतर्फे प्रदान केल्या जाणाऱ्या एस.डी.जी स्कूल २०२५ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शिक्षण क्षेत्रात शाश्वत विकासाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलणाऱ्या शाळांना डऊॠस्कूल पुरस्कार २०२५ द्वारे गौरवण्यात आले. हा पुरस्कार नीती आयोगांतर्गत नोंदणीकृत सेंटर फॉर एज्युकेशनल डेव्हलपमेंट (उएऊ) फाऊंडेशनमार्फत केलेल्या सर्वेक्षणातून आलेल्या निष्कर्षावर दिला जातो. शाश्वत विकासाची ध्येये आपल्या अभ्यासक्रमात व उपक्रमांमध्ये प्रभावीपणे समाविष्ट करणाऱ्या शाळांना हा सन्मान मिळतो. पुरस्काराचा उद्देश शाळांमध्ये पर्यावरणीय जबाबदारी, समता आधारित शिक्षण आणि जागतिक नागरिकत्व यांसारख्या मूल्यांचा प्रसार करणे हा आहे. शिक्षणातून सामाजिक जागरूकता आणि विकास घडवणाऱ्या शाळांना या पुरस्काराच्या निमित्ताने प्रोत्साहन दिले जाते.

सी.ई.डी. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रियदर्शी नायक, डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास पाध्ये यांच्याहस्ते एस.एम.एस. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ. श्रुती रेमणे यांनी शाळेच्यावतीने हा पुरस्कार स्विकारला. मुंबई येथील रसायन तंत्रज्ञान संस्था अभिमत विद्यापीठाचे (इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नोलॉजी (खउढ डीम्ड् युनिव्हर्सिटी) कुलसचिव प्रा. अनिरुद्ध पंडित, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे (डछऊढ) प्राचार्य, तसेच मुंबई विद्यापीठाच्या एम.यू.आयडियाज फाऊंडेशन या स्टार्ट-अप इन्क्युबेशन सेंटरचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सचिन एस. लोढा,



मुंबई : प्रियदर्शी नायक व विलास पाध्ये यांच्याहस्ते पुरस्कार स्वीकारताना एस.एम.एस. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती रेमणे.

बालपण संगोपन आणि शिक्षण असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. स्वाती पोपट वत्स यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ शनिवार, दि. १२ जुलै रोजी मुंबई येथे संपन्न झाला.

एस.एम.एस. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्था पदाधिकारी व विश्वस्त यांनी प्राचार्या डॉ.श्रुती रेमणे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या पुरस्कारामुळे शिक्षण मंडळ, कराड व शाळेचा नावलौकिक वाढला असून सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### धमकी दिल्या प्रकरणी एका विरोधात तक्रार

**सातारा/प्रतिनिधी:**

धमकी दिल्या प्रकरणी एका विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १४ रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास जुबेर अब्दुल मुलांनी राहणार सासपडे तालुका सातारा यांना धमकी दिल्या प्रकरणी तेथीलच अनिल रमेश मोरे यांच्या विरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत रघुकुल विद्यालयाचे यश

**मल्हारपेठ/प्रतिनिधी : -**

नाडे येथील रघुकुल विद्यालयाने शिष्यवर्ती परीक्षेत यशाची भरारी कायम ठेवली असून, यावर्षी इयत्ता पाचवीचे दोन तर इयत्ता आठवीचे दोन असे चार विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. दरम्यान, शाळेतील विद्यार्थ्यांनी मंथन, स्पीडमॅथ, त्याचबरोबर शिष्यवृत्ती परीक्षेत आपली यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

रघुकुल विद्यालयातील इयत्ता पाचवीतून शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकूण ३८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी २२ विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले असून, दोन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीधारक होण्याचा मान पटकावला आहे. त्याचबरोबर इयत्ता आठवीतील बसलेल्या ११ विद्यार्थ्यांपैकी आठ विद्यार्थी पात्र ठरले असून, दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक बनले आहेत. इयत्ता आठवीतून आर्या पाटील ३०० पैकी २४४ गुण मिळवून जिल्ह्यात ५१ वा क्रमांक प्राप्त केला. संचिता करपे २१६ गुण मिळवून महिला आरक्षणमधून जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. पाचवीतून राजलक्ष्मी साळुंखे २५६, ईश्वरी कदम २४६ गुण मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय देसाई, सचिव डॉ.




रुपाली देसाई, सर्व संचालक, तसेच मुख्याध्यापक शुभांगी नलवडे, सविता सुर्वे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी अभिनंदन केले.

# पोवई नाका परिसरातून दुचाकीची चोरी

**सातारा/प्रतिनिधी:**

पोवई नाका परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ८ जुलै रोजी रात्री आठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान पोवई नाका परिसरातील राजपुरोहित दुकानासमोरून प्रथमेश मोहन पुरोहित रा. रविवार पेठ, सातारा यांची ज्युपिटर कंपनीची दुचाकी क्र. एमएच ११ डीसी ५४८१ अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार मेचकर करीत आहेत.



चिंचणी (अं.) : सोहम महाडीकचा सत्कार करताना मुख्याध्यापक अरुण सावंत, डॉक्टर, शिक्षक आदी.

# सोहम महाडीकचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**कडेगाव/प्रतिनिधी : -**

तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील श्री शिवाजी हायस्कूलच्या सोहम सागर महाडीक या विद्यार्थ्याने २४० गुणांसह शिष्यवृत्ती परीक्षेत सांगली जिल्हा गुणवत्ता यादीत १९१ वा क्रमांक व कडेगाव तालुक्यातून पाचवा क्रमांक संपादन करून यश मिळविले.

पाचवी स्कॉलरशिप विभागप्रमुख म्हणून जी.व्ही. घुगे व ए.वाय. शिकलगार यांनी संयुक्तपणे काम पाहिले. मार्गदर्शक शिक्षक म्हणून श्रीमती एस.ए. माळी व सौ.एम.ए. भानुसे यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी विद्यालयाच्यावतीने मुख्याध्यापक अरुण सावंत, तसेच कृष्णा हॉस्पिटलच्या डेंटल विभागाचे डॉक्टर यांच्याकडून सोहम महाडीकचा सत्कार करण्यात आला. यावेळी पर्यवेक्षक सतीश मेटकरी, कृष्णा हॉस्पिटलचे डेंटल विभागाचे स्टाफ, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# सत्य निर्भयपणे सांगण्याची ताकद फक्त न्याय व्यवस्थेतच

## एस.के. गायकवाड

**नळदुर्ग/प्रतिनिधी : -**

राजकीय चळवळीतील मंत्री, लोकप्रतिनिधींना काही सामाजिक हितसंबध जोपासायचे असतात, काहींची मर्जी सांभाळावयाची असते. त्यामुळे ते कधीकधी असत्याला पाठीसी घालण्याचा प्रयत्न करतात. परंतु, भारतीय राज्य घटनेने न्याय व्यवस्थेला स्वतंत्र स्वायत्तेचा दर्जा दिलेला आहे. त्यामुळे निर्भयपणे सत्यता पडताळून ते सत्ये सांगण्याची ताकद फक्त आणि फक्त न्यायव्यवस्थेतच आहे. म्हणूनच आजही न्यायालयावर जनतेचा विश्वास असल्याने न्यायव्यवस्थेलाचं न्याय देवता असे संबोधले जाते. तेव्हा वकिलांनी



निव्वळ व्यवसाय न पहाता, एकादा निरापराधी व्यक्तीवर अन्याय होऊ नये, याची दक्षता घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन रिपाइंचे (आठवले) धाराशिव जिल्हा सचिव एस.के. गायकवाड यानी केले.

नळदुर्ग येथील अॅड. अभिजीत बाबुराव बनसोडे यांनी लोकमान्य वाचनालयाच्या गाळ्यात सुरु करण्यात आलेल्या भारत सरकाराची नोटरी सेवा संपर्क कार्यालयाचे उदघाटन रिपाइं (आठवले) पक्षाचे जिल्हा कोषाध्यक्ष तथा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबुराव बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी मान्यवरांच्या वतीने अॅड. अभिजीत बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे, रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. आंबेडकर, इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्य प्रवर्तक संस्थापक मारुती खारवे, पत्रकार सुनिल बनसोडे, माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर, रिपाइंचे तुळजापूर तालुकाध्यक्ष अरुण लोखंडे, उपाध्यक्ष महादेव कांबळे, राजेंद्र शिंदे, कार्यकर्ते उपस्थित होते.



**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

### नशिबाची परीक्षा

शनिवार १९ जुलै २०२५

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ४-८-० मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 149<br>158<br>220 | 4-9 | 180<br>379<br>360 | 46-19-58-03-92 |

**कल्याणम**

उदय-अस्त | सिंगल ६-३-७ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 150<br>169<br>600 | 6-2 | 156<br>246<br>660 | 60-42-13-15-28 |

**मुंबैम (मेन )**

उदय-अस्त | सिंगल ----- मजबुत

| | जोड |
|---|---|
| सुट्टी | |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

### आज का अंदाज

शनिवार दिनांक १९ जुलै २०२५

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ३ - ४ - ५ - ७ | - |
| १२०-१५८-१६८-२५० | - |
| ३००-३४७-३४८-३४० | |
| २४६-२३९-२५८-४४९ | |
| **जोडी** | **जोडी** |
| ३२ -४२ - ५१ - ७१ | २४ -५४ - ६१ - ७१ |
| ३० -४० - ५९ - ७९ | २८ -५८ - ६९ - ७९ |
| ३८ -४८ - ५६ - ७६ | २० -५० - ६४ - ७४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १९-२१ जुलै
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

शनिवार दिनांक १९ जुलै २०२५

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | २० | ५० | ८६ | ९६ |
| | २१ | ५१ | ८४ | ९४ |
| | २७ | ५७ | ८३ | ९३ |
| | १५६ | २३० | १३४ | ४५० |
| | ४८० | ३५७ | २६० | ३६० |
| | २२८ | ५०० | ३५० | २७० |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# लम्पीची ३५४ जनावरांना लागण

**सातारा/प्रतिनिधी : -**

जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून लम्पी चर्मरोगाने डोके वर काढले असून, आतापर्यंत ३५४ जनावरांना लागण झाली आहे. यामध्ये १६ जनावरांचा मृत्यू झाला आहे. तर सध्या १५४ पशुधनावर उपचार सुरू आहेत. तसेच लम्पीच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागानेही उपाययोजना सुरू केल्या आहेत.

जिल्ह्यात तीन वर्षांपूर्वी लम्पी चर्मरोगाने थैमान मांडले होते. हजारो जनावरे आजाराने बाधित झाली होती. तसेच शेकडो जनावरांचा मृत्यू झाला होता. यामुळे जिल्ह्यातील सर्व पशुधनाला लसीकरण करण्यात आले. त्यानंतर लम्पी रोगाला अटकाव बसला होता. मात्र, आताही लम्पी रोग डोके वर काढू लागला आहे. मागील काही दिवसांपासून बाधित जनावरांची संख्या वाढू लागली आहे. आतापर्यंत ३५४ जनावरांना लम्पीची बाधा झाली आहे. त्यातील १६ पशुधनाचा मृत्यू झाला आहे. तर १८४ जनावरे रोगातून बरी झाली आहेत. सध्या १५४ जनावरांवर उपचार सुरू आहेत. लम्पी बाधितमध्ये माण तालुक्यात सर्वाधिक ५४ जनावरे झाली आहेत. तर कोरेगाव तालुक्यात ३२, खटाव २५, सातारा तालुक्यात २३ आहेत.

जिल्ह्यातील लम्पीचा प्रादुर्भाव पाहता जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या मार्गदर्शनाखाली लसीचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच पशुधन विकास अधिकाऱ्यांची बैठक घेऊन लसीकरणाबाबत सूचना करण्यात आलेली आहे. लम्पीच्या पार्श्वभूमीवर विविध उपाययोजनाही करण्यात येत आहेत.

# तर्कतीर्थांचे विचार मानवता धर्माची शिकवण देणारे

## डॉ.अशोक जोशी

**वाई/प्रतिनिधी:**

वाई येथील यशवंत शिक्षण संस्थेच्या तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी विद्यालयात तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या अनावरण डॉ अशोक जोशी यांच्या हस्ते झाले.

यावेळी यशवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रताप यादव, उपाध्यक्ष श्रीमती वृषाली चव्हाण संचालक अॅड श्रीकांत



वाई येथील तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी विद्यालयात तर्कतीर्थ जोशी यांच्या पुतळ्याचे अनावरण करताना डॉ अशोक जोशी, मायकेल गनेल प्रताप यादव, वृषाली चव्हाण अॅड श्रीकांत चव्हाण प्रा.पंडित टापरे, अल्पना यादव आदी

चव्हाण संस्था निरीक्षक एच.के पवार , प्रा.पंडित टापरे, अल्पना यादव यांची प्रमुख उपस्थिती होते.

यावेळी डॉ जोशी म्हणाले त्यांच्या जीवनावर पूर्णपणे तर्कतीर्थांच्या विचारांची छाप आहे. जातीपाती मानू नकोस,धर्मनिरपेक्ष वाग,मोठा हो, पैसे कमाव पण ते मानवतेसाठी खर्च कर असा सल्ला तर्कतीर्थानी दिल्याचे त्यांनी पुढे सांगितले. दहावीत ९०टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मधुकर लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्ती वितरण सोहळा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अमेरिकेतील सुप्रसिद्ध व्यावसायिक मायकेल गनेल उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ जोशी होते. यावेळी यशवंत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रताप यादव, उपाध्यक्ष श्रीमती वृषाली चव्हाण संचालक अॅड श्रीकांत चव्हाण संस्था निरीक्षक एच.के पवार, प्रा.पंडित टापरे ,अल्पना यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

वाईच्या तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी प्रतिष्ठांनने विद्यालयास भेट दिलेल्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण डॉ जोशी यांच्या हस्ते झाले. विद्यालयात सुरू करण्यात आलेल्या आय लर्न झोनचे उद्घाटन मायकेल गनेल यांच्या हस्ते झाले. यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा गौरव यावेळी करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र कांबळे यांनी केले. अरुंधती जाधव यांनी पालकांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. परविन मुल्ला व सारिका ढेकाणे यांनी उपक्रमाचे वाचन केले. उप मुख्याध्यापक गणेश ससाने यांनी आभार मानले राजेश भोज यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी पालक व विद्यार्थी उपस्थित होते.


## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत

## जाहीर नोटीस

मौजे खराडेवाडी ता. फलटण जि. सातारा या पंचक्रोशीतील तमाम लोकांना, सरकारी कार्यालये व निमसरकारी कार्यालये, वित्तीय संस्था, पतसंस्था, यांना या जाहीर नोटीशीने कळविणेत येते की,

ज्याअर्थी उपमुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल्वे, पुणे यांनी प्रस्तावित मौजे खराडेवाडी ता. फलटण जि. सातारा येथील जमीन बारामती-फलटण-लोणंद नवीन रेल्वेलाईन उड्डाणपुल बांधणी या सार्वजनिक प्रयोजना करिता महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण-०३/२०१५/अ-२ दिनांकः १२ मे २०१५ व दिनांकः ३० सप्टेंबर २०१५ मधील तरतुदींस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने उपमुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल्वे, पुणे यांचे नावे घेणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी सातारा यांनी आदेश ई-ऑ. ८९९८३६ क्र. भूसं/खा.वा./एस आर/६६/२०२४ दिनांक २३/१०/२०२४ अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी उक्त शासन निर्णय परिपत्रक दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांकः एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दिनांकः २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करणेबाबत मला निर्देश प्राप्त आहेत.

ज्याअर्थी आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार मी प्रियांका आंबेकर, उपविभागीय अधिकारी फलटण उपविभाग फलटण याद्वारे (एक) अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने रेल्वे विभाग तर्फे उपमुख्य अभियंता (निर्माण), मध्य रेल्वे, पुणे यांचे नावे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करित आहे आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूसंपादन कायदा, २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्युल-१ च्या तरतुदींनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देवून मोबदला निश्चित करणे येईल.

(तीन) संबंधित भू-धारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणा प्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे रेल्वे विभागातर्फे उपमुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल्वे पुणे यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असलेबाबतची संमती पत्रे (विकल्प) मागवित आहे.

२. संबंधित भू-धारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) उपविभागीय अधिकारी फलटण उपविभाग फलटण/उपमुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल्वे पुणे यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राच्या (विकल्प) विहीत नमुना उपविभागीय अधिकारी फलटण उपविभाग फलटण / उपमुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल्वे पुणे यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालया मार्फत रेल्वे प्रकल्पाच्या प्राधिकृत अधिकाऱ्या मार्फत भू-धारकास उपलब्ध करून देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करणे आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी फलटण उपविभाग फलटण/उपमुख्य अभियंता (निर्माण) मध्य रेल्वे पुणे यांचे कार्यालयीन वेळेत भू-धारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

### अनुसूची-एक

### खाजगी वाटाघाटीने थेट खरेदीद्वारे संपादित करावयाच्या जमिनीचा तपशिल

**गावाचे नावः खराडेवाडी तालुकाः फलटण जिल्हाः सातारा**

| अ. क्र. | गावाचे नाव | तालुका | खातेदाराचे नाव | संपादित गट/ सर्व्हे नं. | भूधारणा पध्दती | संपादित गटाचे ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (हे.आर) | संपादित क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खराडेवाडी | फलटण | सुशीला महादेव सोनवलकर, हेमंत महादेव सोनवलकर, शुभांगी राजेश पांढरे, सुप्रिया सचिन धायगुडे, वर्षा शुभम कराडे, राहुल गणपत सोनवलकर, अमोल गणपत सोनवलकर | ४०/१ पै. | वर्ग-१ | १.२२ | ००.१७.२० |
| २ | खराडेवाडी | फलटण | गोरख रघुनाथ भुजबळ, राजेंद्र रघुनाथ भुजबळ, सुमन रघुनाथ भुजबळ, सुदाम विठोबा भुजबळ | ४०/३ पै. | वर्ग-१ | १.४३ | ००.१०.८८ |
| ३ | खराडेवाडी | फलटण | उशा प्रकाश खराडे व इतर २ | ४०/४ पै. | वर्ग-१ | १.१४ | ००.०९.८० |
| ४ | खराडेवाडी | फलटण | संतोष सोपान लोणकर व इतर | ४०/५ पै. | वर्ग-१ | ०.६१ | ००.०९.६० |
| ५ | खराडेवाडी | फलटण | मिना राजेंद्र ढवळे व इतर २ | ४०/६ पै. | वर्ग-१ | १.४९ | ००.११.५० |
| ६ | खराडेवाडी | फलटण | शिवाजी सिताराम भुजबळ व इतर | ४२/१ पै. | वर्ग-१ | १.९८ | ००.०८.३० |
| ७ | खराडेवाडी | फलटण | मारूती तुकाराम भुजबळ व इतर | ४२/२ पै. | वर्ग-१ | १.९३ | ००.०७.६० |
| ८ | खराडेवाडी | फलटण | शंकर महादेव भुजबळ व इतर | ४२/३ पै. | वर्ग-१ | १.६६ | ००.०५.१० |
| | | | | | | **एकूण** | **००.७९.९८** |

तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्क/अधिकार असलेस अगर करार, दावा, मदार असलेल्या पतसंस्था, वित्तीय संस्था, सरकारी कार्यालये व निमसरकारी कार्यालये, आरक्षण असल्यास प्रस्तावित खरेदीस कोणाचीही काही हरकत असल्यास त्या सर्व संस्था आणि व्यक्तींना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की सदरची नोटीस प्रसिध्द केल्या पासून ३० दिवसांच्या कालावधित खालील पत्त्यावर त्याची लेखी हरकत कार्यालयीन वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांसह समक्ष भेटून सादर करावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध निर्जोखीम आहे असे समजून प्रस्तावित केले प्रमाणे सदरहू मिळकतीचे खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीद्वारे संपादन करण्यात येईल. तद्नंतर कोणाचीही तक्रार वा हरकत ही ग्राह्य धरली जाणार नाही. तसेच सदरची नोटीस ही कोणाचेही नुकसान व फसवणूक होवू नये म्हणून दिली आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हरकती/आक्षेप पाठविणेचा पत्ताः उपविभागीय अधिकारी कार्यालय, फलटण उपविभाग फलटण अधिकारगृह, सिटी बिल्डींग ता. फलटण जि. सातारा.

क्र. भूसंपादन/एस आर/०५/२०२४

दिनांकः / /२०२५

सही/-
ॲड.जितेंद्र एस.पाटील
रेल्वे ॲडव्होकेट

सही/-
उपमुख्य अभियंता (निर्माण)
मध्य रेल्वे,पुणे

सही/-
उपविभागीय अधिकारी
फलटण उपविभाग फलटण तथा
विशेष भूमि संपादन अधिकारी फलटण

जिमाका/सातारा/जा/११६/२०२५-२६


# दुचाकीच्या डिकीतून ३ लाख रुपये लंपास

**सातारा/प्रतिनिधी:**

दुचाकीच्या डिकीतून अज्ञात चोरट्याने ३ लाख रुपयांसह महत्त्वाची कागदपत्रे लंपास केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातार्यातील पोस्ट आफिसमधून ३ लाख रुपयांची रक्कम काढल्यानंतर ती दुचाकीची डिकीत ठेवली. रिमांड होममध्ये काम असल्याने वकील महिला आतून बाहेर येईपर्यंत अवघ्या ४० मिनिटांमध्ये चोरट्यांनी ३ लाखांची रोकड लंपास केली. वैशाली मंगेश जाधव (वय ४३, रा. रामनगर ता.सातारा) यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना दि. १७ जुलै रोजी दुपारी घडली आहे. पैसे, बँकेचे पासबुक, चेकबुक, वकीलपत्राच्या प्रती अशी कागदपत्रे चोरी झाली आहेत. या सर्व घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पाटोळे करीत आहेत.

# रामापूरमध्ये वीर शिवाजी काशीद यांना अभिवादन

**कडेगाव/प्रतिनिधी : -**

स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे नरवीर शिवाजी काशीद यांची पुण्यतिथी रामापूर (ता. कडेगाव) येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला सांगली जिल्ह्यातून हजारो नाभिक समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टाळ-मृदंगाच्या निनादात गावातून वीर शिवाजी काशीद यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी राष्ट्रपतीपदक विजेते शाहीर बजरंग आंबी यांनी आपल्या दमदार आवाजात नरवीर शिवाजी काशीद यांच्या शौर्याचा आणि त्यागाचा पोवाडा सादर केला. त्यांच्या पोवाड्याने उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना अधिकच प्रज्वलित झाली. बालशाहीर अमोघराज आंबी, चिन्मय व श्रीवर्धन आंबी या बालकलाकारांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

या कार्यक्रमासाठी दूरध्वनीद्वारे मनोगत व्यक्त करताना आमदार विश्वजित कदम म्हणाले, नरवीर शिवा काशीद यांनी समोर मृत्यू दिसत



रामापूर : विररत्न शिवाजी काशीद यांना अभिवादन करताना दिग्विजय कदम, सोमनाथ साळुंखे, जयवंत सूर्यवंशी, रवींद्र पवार, सतीश लोखंडे आदी मान्यवर.

असतानाही छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यावरील आपल्या निष्ठेसाठी मरण पत्करले. त्यांचा हा पराक्रम आणि त्याग आजच्या तरुणाईसाठी प्रेरणादायी आहे. नाभिक समाजाच्या प्रलंबित समस्या सोडविणार आहे.

माजी आ. पृथ्वीराज देशमुख यांनी नाभिक संघटनेचे कौतुक करतानाच समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. युवा नेते दिग्विजय कदम, उद्योजक रोहित महाडिक यांनी उपस्थित राहून या वीररत्नाला अभिवादन केले. नाभिक महामंडळाचे राज्य उपाध्यक्ष प्रा. सोमनाथ साळुंखे, जिल्हाध्यक्ष जयवंत सूर्यवंशी यांनी नरवीर शिवाजी काशीद यांच्या कार्याची महती सांगितली.

कार्यक्रमाचे स्वागत मोहन यादव, प्रास्ताविक सतीश लोखंडे, सूत्रसंचालन शांतीनाथ मांगले, तालुकाध्यक्ष रवींद्र पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास नाभिक समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्रांतिवीर किसनवीर माध्यमिक विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**वाई/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेद्वारा आयोजित सन २०२४ -२५ च्या इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत क्रांतिवीर किसनवीर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी कार्तिक स्नेहल गायकवाड याने तालुका गुणवत्ता यादीत अनुसूचित जाती प्रवर्गातून ग्रामीण विभागातून प्रथम क्रमांक पटकावला तसेच जिल्हा गुणवत्ता यादीत ९ वा.क्रमांक



प्राप्त केला त्याच्या या यशासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. माने मॅडम, शिष्यवृत्ती विभागप्रमुख जावळे सर वर्ग शिक्षिका डेरे मॅडम, जगताप, बनसोडे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष. ना.मकरंद पाटील मदत व पुनर्वसन मंत्री महाराष्ट्र राज्य, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक चेअरमन व खा. नितीन पाटील संस्था उपाध्यक्ष माधवराव डेरे सचिव कृष्णराव डेरे संचालक मधुकर डेरे, पुरुषोत्तम डेरे, प्रवीण पोळ व विश्वस्त महेश डेरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पालक व कवठे गावचे सरपंच मंदाकिनी पोळ सर्व सदस्य ,पोलिस पाटील व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



# निनाईदेवी हायस्कूलमध्ये जागतिक पिशवी दिन साजरा

**कोळे/प्रतिनिधी : -**

तुळसण, ता. कराड येथील निनाईदेवी हायस्कूलमध्ये नुकताच जागतिक पिशवी दिन साजरा करण्यात आला.

यावेळी बोलताना मुख्याध्यापक कल्याण कुलकर्णी म्हणाले, सध्या प्लास्टिक पिशव्या बंद करून कागदी पिशव्या वापरण्याची गरज आहे. असे न केल्यास पर्यावरणाची हानी होईल व जैवविविधता धोक्यात येईल. त्यासाठी समाज, शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांनी प्लास्टिकचा वापर बंद करून कागदी पिशव्यांचा वापर करण्यासाठी जनजागृती केली पाहिजे.

या कार्यक्रमांमध्ये प्रणाली मोरे, समृद्धी वीर, प्रतीक माने, संग्राम मोरे, रुद्र कुराडे, सर्वेश करांडे, प्रथमेश चव्हाण, वेदांत साळुंखे या विद्यार्थ्यांनी कागदी पिशव्या बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. यावेळी आनंद जानुगडे, वैभव जाधव, रघुनाथ पोतदार, जयवंत काटेकर, विठ्ठल काटेकर, अस्मिता वीर-पाटील व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# आदेशाचा भंग केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**

तडीपार आदेशाचा भंग केल्याप्रकरणी एकाविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, तडीपारीचे आदेश असतानाही त्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी शाहरुख नौशाद खान (वय ३०, रा. सोमवार पेठ, सातारा) याच्यावर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवार पेठ येथे तो आला असल्याची माहिती शाहूपुरी पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांच्यावर दि. १७ जुलै रोजी ही कारवाई करण्यात आली.

# अपघात प्रकरणी ट्रक चालकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**

ट्रक व एसटीच्या झालेल्या अपघात प्रकरणी ट्रक चालकावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, मिलींद शालीक कंकाळ (वय ३६, रा. मिरज) यांनी शंकर महादेव माने (वय ४३, रा. येलदरी ता.जत) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा अपघात १७ जुलै रोजी शेंद्रे ता.सातारा येथे झाला आहे. संशयित चालक ट्रक घेवून जात असताना एसटी पंक्चर झाली असल्याने ती थांबलेली असताना पाठीमागून धडक बसली. अपघातात वाहनांचे नुकसान झाले आहे.


## ग्रामपंचायत माळवाडी

### ता.कराड,जि.सातारा

### नोटीस

मौजे माळवाडी ग्रामपंचायतीमध्ये पूर्वीचे शिपाई हे सेवानिवृत्त झालेने त्यांच्या जागेवर नविन शिपाई पदाची जागा भरावयाची आहे.सदर शिपाई पद हे भरणेचे आहे. सदर पदासाठी उमेदवारांनी दि.२८/०७/२०२५ पर्यंत ग्रामपंचायतमध्ये अर्ज करावेत.

अटी

१)वय १८ ते ३८ वर्षापर्यंत असावे.
२)स्थानिक गावातील रहिवाशी असावा.
३)शिक्षण- ७ वी पास असावे उच्च अर्हता धारकास प्राधान्य.
४)शाळासोडलेचा दाखला जोडावा.
५)आधार कार्ड जोडावे.
६)सदर भरती प्रक्रिया कोणत्याही पातळीवर रद्द करणेचे अधिकार प्रशासक ग्रामपंचायत यांना राहिल.

सही/-
प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत माळवाडी

महावितरण

## निविदा सूचना

मान्यताप्राप्त व महावितरणच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून सातारा मंडलांतर्गत सातारा व कराड विभागामध्ये बाह्यस्रोत कंत्राटी कामगार पुरविणेकरीता निविदा मागविण्यात येत आहेत (सातारा विभाग- निविदा क्र.०५/२०२५-२६, रक्कम रु. ६४८.८५ लक्ष + GST), (कराड विभाग - निविदा क्र. ०६/२०२५-२६, रक्कम रु.६६४.७५ लक्ष + GST) सदर निविदा ई-टेंडरिंग पद्धतीनेच भरता येतील. त्याकरीता निविदा भरु इच्छिणाऱ्या पुरवठादारांचे महावितरणकडे ई-टेंडरिंग नोंदणी असणे आवश्यक आहे. निविदेबाबतचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील. अधिक माहिती व निविदा प्रत www.mahadiscom.in या संकेतस्थळावर दि. २७.०७.२०२५ रात्री १२.०० पर्यंत उपलब्ध राहील.

मुख्य कार्यालय, मुंबई
पी. आर.ओ. क्र. १७१/२५

अधीक्षक अभियंता,
महावितरण, मंडल कार्यालय, सातारा.

महावितरण

## ई-निविदा सूचना क. 004 / 2025-26

महावितरण तसेच शासन ई-नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदारांकडून कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रूपये |
|---|---|---|
| टि-23(Recall) /2025-26 | सं. व सु. विभाग फलटण अंतर्गत शिरवळ शहर व ग्रामीण शाखा कार्यालय ता. खंडाळा जि. सातारा परिसरामधील कुंपणाची दुरूस्ती करणे. (कालावधी 3 महिने) | रू.9.30 लाख |
| टि-26/ 2025-26 | सं. व सु. विभाग वाई जि. सातारा अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी 6 महिने) | रू.9.99 लाख |
| टि-27/ 2025-26 | सं.व सु. विभाग फलटण जि. सातारा अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी 6 महिने) | रु.9.99 लाख |
| टि-28/ 2025-26 | सं.व सु. विभाग वडुज जि. सातारा अंतर्गत दैनंदिन स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी 6 महिने) | रु.9.99 लाख |
| टि-29/ 2025-26 | कृष्णानगर सातारा जि. सातारा येथील वर्ग 4 कर्मचारी वसाहतीमधील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी 3 महिने) | रू.9.99 लाख |
| टि-30/ 2025-26 | संवसु विभाग बारामती जि. पुणे येथील बावडा शाखा कार्यालयामधील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत. (कालावधी 3 महिने) | रू.9.98 लाख |
| टि-31/ 2025-26 | संवसु विभाग केडगाव जि. पुणे येथील केडगाव दापोडी शाखा कार्यालयामधील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबावत (कालावधी 3 महिने) | रु.7.59 लाख |
| टि-32(Recall) /2025-26 | संवसु विभाग सोलापुर ग्रामीण जि. सोलापुर येथील 33/11 के.व्ही. तांदुळवाडी सबस्टेशन येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत. (कालावधी 3 महिने) | रू.8.61 लाख |
| टि-33(Recall) /2025-26 | संवसु विभाग सोलापुर ग्रामीण जि. सोलापुर येथील 33/11 के. व्ही. निंबरगी सबस्टेशन येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणेबाबत. (कालावधी 1 महिने) | रू.3.66 लाख |

ई- निविदा विक्रीचा कालावधी **दि. 19.07.2025 ते दि. 25.07.2025** रोजी **दुपारी 12.00 वाजेपर्यंत** असून ई- निविदा सादर करण्याची अंतिम तारीख **दि. 25.07.2025 रोजी दुपारी 15.00** वाजेपर्यंत आहे. ई-निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : कार्यकारी अभियंता (स्था), बारामती **मो. 7875768555** निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितांनी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीदारांनी राखुन ठेवलेले आहेत.

PRO/BMTZ/068/2025-26

कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य विभाग, बारामती

# मनोमिलनाच्या चर्चेचा चेंडू शिवेंद्रसिंह राजे यांच्या कोर्टात

## कास तलावाच्या ओटी भरण कार्यक्रमानंतर खासदार उदयनराजे यांची टोलेबाजी



***सातारा/प्रतिनिधी:***
सातारा नगरपालिकेमध्ये दोन्ही राजांचे मनोमिलन की मैत्रीपूर्ण लढती या प्रश्नावर खासदार उदयनराजे भोसले यांनी नेहमीप्रमाणे राजकीय टोलेबाजी केली .माझे मन सरळ आहे मी स्थानिक पातळीवर राजकारण करत नाही पुढचा निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे यांनी घ्यावा असे स्पष्ट करत उदयनराजे यांनी मनोमिलनाच्या चर्चेचा चेंडू शिवेंद्रसिंहराजे यांच्या कोर्टात टोलवला आहे.

आम्ही चर्चा करणार आहोत मात्र ते कॅबिनेट मंत्री असून सध्या बिझी आहेत अशी मिश्किली केली सुद्धा त्यांनी केली खासदार उदयनराजे भोसले यांच्या उपस्थितीत कास तलावाच्या ओटी भरणाचा कार्यक्रम दोन वर्षाच्या कालखंडानंतर पार पाडला यावेळी माजी नगराध्यक्ष रंजना रावत, सुजाता राजेमहाडिक, शिवानी कळसकर, माजी सभापती अनिता घोरपडे, माजी उपनगराध्यक्ष मनोज शेंडे, राम हदगे,राजू भोसले, सागर पावशे, पंकज चव्हाण, खासदार उदयनराजे भोसले यांचे समर्थक व प्रतापगड प्राधिकरण समितीचे सदस्य काका धुमाळ, माजी नगरसेवक वसंत लेवे , पाणी पुरवठा विभागाचे अभियंता शहाजी वाठारे संदीप सावंत इत्यादी यावेळी उपस्थित होते

ओटी भरण कार्यक्रम झाल्यानंतर प्रकारांनी उदयनराजे यांना आगामी नगरपालिका निवडणुका आणि त्याचे राजकीय समीकरण या मुद्द्यावर छेडले असता ते म्हणाले मी स्थानिक पातळीवर कधीही राजकारण करत नाही आजपर्यंत मी नेहमी समाजकारण केले .कोणालाही बाजूला सरकवण्याचा मी कार्यक्रम केला नाही कारण राजकारण करायला अक्कल लागत नाही. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले सध्या बिझी आहेत पक्ष चिन्ह की आघाडी याबाबतचा निर्णय आम्ही चर्चा करून घेऊ हा निर्णय मी हा एकटा घेऊ शकत नाही मनोमिलनाच्या संदर्भातही ते म्हणाले की माझे मन सरळ आहे आता यापुढील निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे यांनी घ्यावा ही चर्चा केव्हा होणार या प्रश्नावर ते म्हणाले की चर्चा होईल पण सध्या शिवेंद्रसिंहराजे बिझी आहेत .योग्य वेळी काय ते चर्चा करून निर्णय घेऊ असे त्यांनी स्पष्ट केले .

विधानसभेच्या आवारात आमदार गोपीनाथ पडळकर व राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांत जोरदार मारामारी झाली या प्रश्नावर बोलताना खासदार उदयनराजे भोसले म्हणाले आपण लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आहोत लोकांना आपल्याकडून अपेक्षा असतात आपल्याकडून विकास कामे तसेच आपले सामाजिक जीवनातील वर्तन याविषयी लोकांचा विरस झाला तर आपल्या प्रतिनिधीत्वाला अर्थ उरत नाहीत . विधानसभेच्या आवारात अशा प्रकारचे वर्तन आमदारांनी करू नयेत लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे मतभेदांमध्ये वादावादी होऊ शकते मात्र त्या चर्चेचे स्वरूप मारामारी पर्यंत जाऊ नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली

महाराष्ट्रातील बारा किल्ल्यांना युनेस्कोच्या वारसा स्थळाच्या यादीत स्थान मिळाले त्याबाबत बोलताना उदयनराजे म्हणाले गडकोट किल्ल्याचे पावित्र्य आणि तेथील ऐतिहासिक संदर्भ जपणे हे नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे अन्यथा गडकोट किल्ल्यांचे आणि वारसा स्थळांचे विद्रूपीकरण करणे अशाच प्रवृत्ती वाढत आहेत .वारसा स्थळांची प्रक्रिया ही अत्यंत वेळखाऊ असते त्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागते महाराष्ट्रातील नागरिकांची आता जबाबदारी वाढलेली आहे . त्या कार्यक्षेत्रातील नागरिकांनी तसेच राज्य शासनाने समन्वयाने या वारसा स्थळांचे पावित्र्य राखणे गरजेचे आहे .तसेच कास धरण प्रकल्पाच्या पूर्णत्वाचा आम्हाला अभिमान आहे सातारकरांच्या आगामी भविष्यातील पाण्याचा प्रश्न पाहून आम्ही या धरणाची उंची वाढवली सातारा शहरासह १६ गावांचा २०५० पर्यंतचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे तसेच कास तलावात काही ठिकाणी छोटी छोटी बेटे आहेत या बेटांजवळ काही बंधारे घालून तेथेही पाणी अडवता येते का याची आम्ही माहिती घेत आहोत. याशिवाय कास पठारावर काही साहसी क्रीडा प्रकार विकसित व्हावेत याबाबतचा प्रस्ताव आम्ही स्तरावर सादर केलेला आहे त्याबाबत आमचा पाठपुरावा सुरू आहे . कास धरण परिसर आणि येथील निसर्ग तेथील पर्यावरण हे जपणं हे सातारकरांचे कर्तव्य आहे या पर्यावरणाला कचरा टाकून कलंक लावू नये आपला परिसर आपणच स्वच्छ ठेवावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली .

सातारा विकास आघाडीच्या माजी नगरसेविकांनी कास तलावाला साडी अर्पण करून मनोभावे नमस्कार केला. मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून वर्षभर साताऱ्याला पाणीपुरवठा करणाऱ्या कास तलावाची मनोभावे पूजा करण्यात आली.


महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त

**पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट**

Email : patilinstitutesatara@gmail.com

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी

- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय

प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.

प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१


# वायरिंगसाठी आणलेल्या विद्युत वाहक तारांचे ४० बंडल चोरट्यांनी लांबवले

***कराड/प्रतिनिधी : -***
शहरातील वाखाण रोडवर कृष्णांगण सोसायटीसमोर इमारतीचे बांधकाम सुरू असताना वायरिंगसाठी आणलेल्या विद्युत वाहक तारा चोरट्यांनी लांबवले. १ लाख १० हजार रुपये किमतीचे ४० बंडल चोरट्यांनी चोरून नेले. गुरुवार, दि. १७ सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत विजयकुमार विनायक सकपाळ यांनी कराड शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, शहरातील वाखाण रोड येथे कृष्णांगण सोसायटीसमोर विजयकुमार सकपाळ यांच्या बंगल्याचे बांधकाम सुरू आहे. सध्या बंगल्यामध्ये वायरिंग, तसेच फिटिंगचे काम केले जात आहे. त्यासाठी वायरचे बंडल आणून ठेवण्यात आले होते. बुधवारी रात्रीपर्यंत वायरिंगचे काम सुरू होते. त्यानंतर काम बंद करण्यात आले. दुसर्या दिवशी सकाळी इलेक्ट्रिशन राहुल पोळ हे शिल्लक राहिलेले काम करण्यासाठी आले असता बंगल्यातील १ लाख १० हजार रुपये किमतीच्या विद्युत वाहक तारांचे ४० बंडल चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी याबाबतची माहिती दिल्यानंतर विजयकुमार सकपाळ यांनी त्याठिकाणी जाऊन पाहणी केली. याबाबतची फिर्याद कराड शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.

# कोयना सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध

## युवा नेते आदिराज पाटील-उंडाळकर यांची संचालकपदी निवड

***कराड/प्रतिनिधी : -***
कोयना सहकारी बँक लि., कराड या बँकेची सन २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीसाठीची संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. या निवडणुकीत नव्या नेतृत्वाची भर पडली. या निवडणुकीत अपर्णा यादव, उपनिबंधक, सहकारी संस्था, कराड यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पारदर्शक आणि शांततेत प्रक्रिया पार पाडली.

यामध्ये आदिराज पाटील-उंडाळकर (उंडाळे), तुकाराम डुबल (म्होप्रे), हणमंत देसाई (वाठार), बाळासाहेब जाधव (पाडळी), राजकुमार पाटील (अंबवडे), सुजित थोरात (कार्वे), कृष्णत पाटील (काले), साहेबराव शेवाळे (कराड), महादेव पाटील (वारुंजी), सागर जाधव (आगाशिवनगर/मलकापूर), सीमा पाटील (आटके), रेश्मा पाटील (तांबवे), संपत बडेकर (सुपने), नदीम सुतार (कराड), लालासाहेब गिरी (मरळी/चोरे) यांची संचालक म्हणून बिनविरोध निवड झाली आहे.







सन १९९६ मध्ये माजी सहकार मंत्री, लोकनेते स्व. विलासकाका पाटील-उंडाळकर व ॲड. उदयसिंह पाटील-उंडाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या कोयना सहकारी बँकेने गेल्या काही दशकांत स्थानिक अर्थव्यवस्थेत भरीव योगदान दिले आहे. सहकार क्षेत्रात आदर्श ठरलेली ही संस्था आता नव्या पर्वात प्रवेश करत आहे.

बेकेचे संस्थापक ॲड. उदयसिंह पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनामुळे बँकेने स्थापनेपासून आजपर्यंत सातत्याने 'अ' ऑडिट वर्ग प्राप्त केला असून, रिझर्व्ह बँकेचे सर्व नियामक निकष वेळेवर पूर्ण करत आदर्श सहकारी बँकेचा मान टिकवून ठेवला आहे.

या निवडणुकीत युवानेते अदिराज पाटील-उंडाळकर यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याने नव्या पिढीचे प्रतिनिधित्व बँकेच्या व्यवस्थापनात झाले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे बँकेच्या कारभारात नव्या संकल्पना, नवदृष्टी आणि तंत्रज्ञानाचा वापर यास गती मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. त्यांचे कार्यक्षेत्रातील योगदान आणि तरुणांशी असलेला संवाद स्थानिक तरुणाईला निश्चीत नवी दिशा देईल.

ॲड. उदयसिंह पाटील यांनी नवनिर्वाचित संचालकांचे स्वागत करत, बँकेच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच सहकार्य राहील, अशी ग्वाही दिंली.

नवीन संचालक मंडळाने ॲड. उदयसिंह पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पारदर्शक कारभार करून शेतकरी, व्यापारी, व्यावसायिक तसेच सर्वसामान्य ग्राहकांसाठी अधिकाधिक सुविधा देण्याची ग्वाही देवून माजी सहकार मंत्री स्व. विलासकाका पाटील यांना अभिप्रेत असलेल्या सहकाराच्या मुलामंत्रास अधीन राहुन आगामी काळात डिजिटल बँकिंग सेवा, कर्जप्रक्रियेत सुलभता, आणि ग्राहकसेवा सुधारणा या बाबतीत विशेष योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असलेचे सांगितले.

# सोलापूरात वकिलाने केला पत्नीचा खून

## वकील पती स्वत: फौजदार चावडी पोलीस ठाण्यात झाला हजर

***सोलापूर/प्रतिनिधी:***
सोलापुरात वकिलाने पत्नीचा खून करून स्वतः फौजदर चावडी पोलिस ठाण्यात हजर झाला असल्याची घटना आज शुक्रवारी दिनांक १८ जुलै रोजी सकाळी उघडकीस आली. वकील पती पोलीस ठाण्यात दाखल होऊन आपण आपण चाकू ने गळा चिरून पत्नीचा खून केला असल्याचे पोलिसांना सांगितले.

यानंतर तातडीने पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी सदर महिलेला तातडीने सोलापूर येथील सिव्हिल रुग्णालयात दाखल केला परंतु उपचारापूर्वीच सदर महिला मरण पावली होती महिलेचा पती वकील असल्याची माहिती मिळाली.

सोलापूर शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे.



वसंत विहार, स्वराज्य विहार ब्रिजजवळ राहणाऱ्या प्रशांत रवींद्र राजहंस वय ४४ यांनी आपली पत्नी भाग्यश्री प्रशांत राजहंस वय ३४ यांचा चाकूने गळ्यावर वार करून खून केल्याची कबुली फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली. ही घटना आज सकाळी ११:१५ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत राजहंस यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राऊत यांच्याकडे स्वतःहून हजर होऊन आपल्या पत्नीचा खून केल्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पत्नी भाग्यश्री यांच्याशी भांडण झाल्याने त्यांनी चाकूने तिच्या गळ्यावर वार केले. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली असता, भाग्यश्री या जखमी आणि बेशुद्ध अवस्थेत आढळल्या. त्यांना त्वरित सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात (सिव्हिल हॉस्पिटल) दाखल करण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

प्रशांत राजहंस हे व्यवसायाने वकील असून, त्यांनी स्वतः आपल्या पत्नीचा खून केल्याची कबुली दिल्याने सोलापूर शहरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच नातेवाइकांनी शासकीय रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. खुनामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अधिक तपास पोलीस करत आहेत

# युवक राष्ट्रवादीच्या वतीने स्पर्धा परीक्षेचे युवक-युवतींच्यासाठी पुस्तक संकलन उपक्रम

***इस्लामपूर/प्रतिनिधी:***
राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष, युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वाळवा तालुका युवक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तालुक्यातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या गरजू युवक-युवतींना देण्या साठी पुस्तक संकलन करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका कार्याध्यक्ष देवराज देशमुख यांनी केले आहे.

युवा नेते प्रतिकदादा पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रम व स्पर्धांनी सर्वत्र साजरा केला जात आहे. आपण वाढदिवसा ला पुष्पहार,पुष्पगुच्छ,तसेच भेट वस्तू देऊन वाढदिवस साजरा करीत असतो. मात्र या पारंपरिक शुभेच्छा पध्दतीला फाटा देऊन समाजोपयोगी काम करून प्रतिकदादा पाटील यांना शुभेच्छा देण्याचा युवक राष्ट्रवादी चा प्रयत्न आहे.



वाळवा तालुक्यातील अनेक युवक-युवती स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहेत. यातील गरजू युवक-युवतींना स्पर्धा परीक्षेची पुस्तके देण्यासाठी इस्लामपूर,आष्टा शहरासह संपूर्ण तालुक्यातून स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांचे संकलन केले जाणार आहे. दि.१९ जुलैपासून दि.१ ऑगस्ट २०२५ पर्यंत पक्षाचे पदाधिकारी व युवक गांव अध्यक्षांच्याकडे ही पुस्तके द्यायची आहेत. यानंतर युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या हस्ते तालुक्यातील गरजू युवक-युवतींना दिली जाणार आहे.

संदीप पाटील, विनायक यादव, संदीप पाटील, विक्रम पाटील, अभिजित पाटील, सुहास पवार यांच्यासह पक्षाचे युवक पदाधिकारी व कार्यकर्ते हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# कराड पंचायत समिती नूतन प्रशासकीय इमारतीसाठी १५ कोटींचा निधी

## आ.डॉ. अतुल भोसले यांच्या प्रयत्नांना यश; बांधकाम लवकरच होणार सुरुवात

***कराड/प्रतिनिधी : -***
कराड तालुका पंचायत समितीच्या कार्यालयाची नवी सुसज्ज प्रशासकीय इमारत साकारण्यासाठी आमदार डॉ. अतुलबाबा भोसले गेल्या अनेक महिन्यांपासून प्रयत्नशील होते. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे भाजपा-महायुती सरकारने कराड पंचायत समितीच्या स्वतंत्र आणि सुसज्ज प्रशासकीय इमारतीच्या उभारणीसाठी तब्बल १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. ग्रामीण विकास विभागाच्या आदेशानुसार हा निधी मंजूर करण्यात



आला असून, ३६२० चौ. मी. क्षेत्रफळाच्या जागेत या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू होणार आहे.

> कराड पंचायत समितीची नवी प्रशासकीय इमारत सुसज्ज, कार्यक्षम आणि सर्वसमावेशक केंद्र ठरणार आहे. पंचायत समितीचे कामकाज अधिक गतिमान होऊन, नागरिकांना उत्तम सेवा मिळू शकतील. कराड परिसराच्या प्रशासकीय विकासासाठी ही मोठी पाऊलवाट ठरेल, तसेच या इमारतीमुळे कराडच्या सौंदर्यात भर पडेल.
>
> - आ.डॉ. अतुल भोसले

कराड पंचायत समितीची सध्याची प्रशासकीय इमारत ही जुनी व जीर्ण झाली आहे. यामुळे कामकाजासाठी आवश्यक जागा अपुरी पडत आहे. याच इमारतीमध्ये बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे, बाल विकास प्रकल्प आदी विभागांची कार्यालये कार्यरत आहेत. कराड तालुका हा लोकसंख्येच्या आणि कामकाजाच्या दृष्टीने मोठा तालुका असून, शासकीय कामांसाठी याठिकाणी मोठ्या प्रमाणावर लोकं येतात. पण अपुऱ्या जागेमुळे लोकांची मोठी गैरसोय होताना दिसून येत होती. अशावेळी पंचायत समितीशी निगडित सर्व कार्यालये एकाच ठिकाणी यावीत आणि त्या माध्यमातून नागरिकांना सुलभपणे सर्व शासकीय सेवांचा लाभ घेता यावा, यासाठी कराड पंचायत समितीची नवी सुसज्ज प्रशासकीय इमारत उभी करण्याचा संकल्प कराड दक्षिण विधानसभेचे आमदार डॉ. अतुल भोसले यांनी केला होता.

या पार्श्वभूमीवर आ.डॉ. भोसले यांनी नव्या इमारतीच्या उभारणीसाठी काही महिन्यांपूर्वी कराड येथील श्री दैत्यनिवारणी देवी मंदिराशेजारील जागेची पाहणी शासकीय अधिकाऱ्यांसमवेत करून, नव्या इमारतीचा आराखडा तयार केला. शिवाय मुंबईत राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांना हा आराखडा सादर करुन, निधी मंजुरीसाठी प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी लावून धरली होती.

आ.डॉ. अतुल भोसले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागातर्फे या नव्या सुसज्ज इमारतीच्या उभारणीसाठी १५ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सरकारच्या मंजुरीमुळे लवकरच या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू होणार असून, याठिकाणी नागरिकांच्या सोयीसाठी सर्वप्रकारच्या सुविधा उभारण्याचे निर्देश ग्रामविकास विभागाने संबंधितांना दिले आहेत. या इमारतीच्या उभारणीमुळे कराडच्या सौंदर्यात भर पडण्यास मदत होणार आहे. या निधीबद्दल कराडवासीयांमधून भाजपा-महायुती सरकार, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे आणि आ.डॉ. अतुल भोसले यांचे अभिनंदन केले जात आहे.

### अशी असेल इमारत..

कराड पंचायत समितीची नवी भव्य व सुसज्ज इमारत उभारताना, त्याठिकाणी नैसर्गिक प्रकाश, पाण्याचा योग्य वापर आणि हरित इमारतीसाठी आवश्यक तांत्रिक बाबींची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच महिलांसाठी स्वतंत्र विश्रांतीगृह व प्रसाधनगृहाची तरतूद आणि अपंगांसाठी रॅम्प, रेलिंग यासारख्या सुविधादेखील उभारण्यात येणार आहेत.

# प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ अक्कलकोट कडकडीत बंद

## विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनाचा मोठा सहभाग

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***
संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट मध्ये झालेला जीवघेणा भ्याड हल्ला हा पुरोगामी विचारांवर झालेला प्रतिगामी हल्ला असून, बहुजन समाज आणि सकल मराठा समाज हा हल्ला कदापिही खपवून घेणार नाही. या घटनेच्या निषेधार्थ शुक्रवारी अक्कलकोट कडकडीत बंद व निघालेल्या विराट मोर्च्यात सोलापूर जिल्हा तसेच शहरातील बहुजन चळवळीतील सर्व संघटना आणि नेते मोठ्या संख्येने सहभागी झालेले होते. या निषेध मोर्चा व सभेस ५० सामाजिक संघटना, पक्ष यांनी पाठींबा दर्शविला होता. अक्कलकोट व्यापारी असोसिएयने, शाळा, महाविद्यालय उस्फुर्त सहभाग नोंदविला.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज चौक (बसस्थानक) जवळील श्री खंडोबा मंदिर येथे सोलापूर जिल्हा शहर व अक्कलकोट तालुक्यातील बहुजन चळवळीतील सर्व संघटना आणि नेते उपस्थित होते. विराट संख्येने खंडोबा मंदिर येथून निघालेला निषेध मोर्चा महर्षी वाल्मिकी मार्गे, विजय चौक, तारामाता चौक, कारंजा चौक, मेन रोड, तूप चौक (वीर सावरकर चौक), ॲड.सर्जेराव जाधव पथ, सोन्यामारुती चौक, समर्थ चौक, राजे फत्तेसिंह चौक मार्गे नेहरू गल्ली, श्रीमंत कांतामतीराजे विजयसिंहराजे भोसले मार्ग तेथून श्री कमला राजे चौक येथे निषेध मोर्च्याचे विराट सभेत रुपांतर झाले. सभास्थळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे तालुका अध्यक्ष दिलीपभाऊ सिद्धे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, आर.पी.आय. चे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे, दहिटणे गावचे उपसरपंच आणि आंबेडकरी चळवळीचे नेते विकीबाबा चौधरी यांनी हा केवळ हल्ला एका व्यक्तीवरचा नव्हे तर संपूर्ण पुरोगामी चळवळीवरचा आहे. या हल्ल्याची नोंद संपूर्ण महाराष्ट्राने घ्यावी, अशा पद्धतीने अक्कलकोट बंदचे नियोजन करण्यात आले आहे. निषेध मोर्चा व बंद यशस्वी झाल्याचे सांगून प्रशासनावर टीकास्त्र सोडले.

पुढे बोलताना ॲड. नदीम डोणगावकर, संभाजी ब्रिगेड महिला आघाडीचे जिल्हा अध्यक्ष निलम दास,, प्रहार संघटना जिल्हा संपर्क प्रमुख व युवा नेते जमीर शेख, संभाजी आरमारचे श्रीकांत डांगे यांनी प्रवीण गायकवाड यांच्या वरील भ्याड हल्याचा निषेध करून प्रवीण गायकवाड यांनी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून करत असलेल्या कार्याची माहिती देऊन या घटनेतील आरोपींना कडक शासन होण्याची मागणी केली. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी प्रवीण गायकवाड यांच्यावरील जो भ्याड हल्ला झाला, त्या काळातील विस्तृत माहिती दिली. ज्या ठिकाणी घटना घडली, त्याच ठिकाणी आज सभा होत आहे. या सभास्थळीच प्रवीण गायकवाड यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. असे यावेळी सांगितले. पुढे बोलताना शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा अध्यक्ष अमोल बापू शिंदे यांनी प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्याचा निषेध व्यक्त करून प्रवीण गायकवाड यांच्या कार्याची माहिती दिली. व ज्यांनी गायकवाड यांच्यावर हल्ला व कट कारस्थान रचले यांच्यावर आपल्या भाषणाच्या माध्यमातून ताशेरे ओढले. मराठा समन्वयक माऊली पवार, राजन जाधव यांनी प्रवीण गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्याचा तीव्र निषेध करीत पोलीस प्रशासनावर टीकास्त्र सोडले. आणि याप्रकरणी दानशूर जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि दानशूर अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्यावर कांही जणांनी बदनामीचे षडयंत्र सुरू केलेले होते. मात्र या प्रकरणाची खरी माहिती प्रवीण गायकवाड यांना देण्यात आलेली असल्याने त्यावर पडदा देखील पडलेल्याचे यावेळी उभयत्यांनी सांगितले. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अश्पाक भाई बळोरगी यांनी घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करून, पोलीस प्रशासन हे जनेतेचे रक्षक नसून भक्षक बनले असल्याचे आरोप करून प्रशासनावर खरमरीत टीका केली.





या प्रसंगी डॉ. सुवर्णा मलगोंडा, सोलापूरातील मराठा समाजाचे नेते दिलीप भाऊ कोल्हे, नाना काळे, राम गायकवाड, तात्या वाघमोडे, सोमा राऊत, ॲड. गणेश कदम, शाम कदम, प्रताप चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजीराव भोसले, शहर अध्यक्ष शिरीष जगदाळे, निशांत कवडे, मनीषा कोळी, दिलीप निंबाळकर, अरविंद शेळके, शिवाजी चापले यांच्यासह जेष्ठ समाज सेवक सुरेशचंद्र सूर्यवंशी, श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रल्हाद जाधव, जेष्ठ नेते बाळासाहेब मोरे, , अमर शिंदे, सुधाकर गोंडाळ, अमोल पाटील, बाबासाहेब निंबाळकर, शामराव मोरे, अभय खोबरे, पद्माकर डीग्गे, संतोष भोसले,, मनोज निकम, उ.बा.ठा. तालुका प्रमुख आनंद बुक्कानवरे, विलासराव सुरवसे, अकिल बागवान, मतीनभाई पटेल, बंद्देनावज कोरबू, केरबा होटकर, शीतल जाधव, प्रवीण देशमुख, दहिटणे सरपंच नितीन मोरे, महादेव अनगले, युवराज लोणारी, मनोज गंगणे, कुपेंद्र ढाले, सुनील खवळे, राजू पाटोळे, नागू ऐवळे, सुरेश कदम, दयानंद काजळे, अरुण जाधव, अतुल जाधव, लाला राठोड, विलास राठोड, चंद्रकांत सोनटक्के, तम्मा शेळके, संदीप फुगे पाटील, संजय गोंडाळ, सागर गोंडाळ, वैभव नवले, राजू माकणे, सौरभ मोरे, गोविंदराव शिंदे, प्रवीण घाडगे, प्रसन्न हत्ते, विजय माने, बाळासाहेब पोळ, निखील पाटील, अतिश पवार, अतिश कटारे, अंकुश चौगुले, सनी सोनटक्के, अशोक जाधव, शिंदे गटाचे शहर प्रमुख योगेश पवार, वैभव मोरे, विशाल कलबुर्गी, महेश पाटील, सत्तार शेख, सोमशेखर जमशेट्टी, महेश दणके, लक्ष्मण मचाले, मंगेश जाधव, अजय जाधव, मंगेश सूर्यवंशी, प्रसाद मोरे, गणेश पाटील, जोतीबा पारखे, मुन्ना राठोड, बाळासाहेब कुलकर्णी देसाई, सर्फराज शेख, मुबारक कोरबू, शरणप्पा अचलेर, राजेंद्र लिंबीतोटे, कांत झिपरे, योगेश कबाडे, बाबा घंटे, जितेंद्र यारोळे, गणेश होटकर, मैनुद्दीन कोरबू, अलीबाशा अत्तार, इसुप पटेल, अतिक अरब, अश्पाक शहर काझी, बरगली गुड्डे, सद्दाम शेरीकर, अमीन मुजावर, सागर याळवार, शिवा मंगरुळे, पिंटू दोडमनी, श्रीशैल शाली, शाकीर पटेल, धानप्पा कामाटी, श्रीनिवास सोनटक्के, मल्लिनाथ पाटील, मतीन बागवान, शिवानंद फुलारी, स्वामिनाथ गुरव, गिरीश गवळी, पिंटू साठे, तुकाराम धोत्रे, लक्ष्मण झंपले, वासू कडबगांवकर, आकाश शिंदे, मल्लिनाथ नंदिकोले, फहीम पिरजादे, योगेश पवार, लक्ष्मण विभूते, उत्तम इंगळे, सुमित कल्याणी, ऋषी लोणारी, अतिक अरब, रइस टीनवाला, संजय देशमुख, दत्ता माडकर, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, राजू पवार, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, रुद्रय्या स्वामी, शिव स्वामी, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह विविध पक्ष, सामाजिक संघटना व अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते व पाठींबा पत्र दिले.

या बंदमध्ये शाळा, महाविद्यालये, दुकाने व अन्य व्यवहार बंद होती, दवाखाने आणि मेडिकलसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आली होती. बाहेरून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये आणि स्थानिक जनतेला अडचण होऊ नये म्हणून बंद फक्त दुपारी २ वाजेपर्यंत असला तरी तो पूर्णतः कडकडीत होता. प्रस्थाविक, सूत्रसंचालन व आभार: श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब मोरे यांनी मानले.या प्रसंगी तहसीलदार विनायक मगर यांना उपस्थित पदाधिकार्यांनी निवेदन सदर केले. या मोर्चा व सभास्थळी नसरोद्दीन मालीनमली यांनी पाणी बॉटलचे वाटप केले.

### त्याच चौकात सन्मान करणार

ज्या चौकात प्रवीण गायकवाड यांच्याव हल्ला झाला, त्याच चौकात त्यांचा भव्य नागरी सत्कार करून विचारांचा विजय साजरा केला जाईल, विचारांची लढाई ही विचारांनीच लढली पाहिजे, असा संदेश देत त्यांनी हा हल्ला संपूर्ण बहुजन चळवळीवर आहे, असे सांगत एकतेचा निर्धार या सभेत करण्यात आला.